बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | रविवार,दि.८ जून २०२५ | वर्षे४थे | अंक२९०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# आठवड्यात कोरोनामुळे ५० मृत्यू ; ३००० रुग्ण वाढले

**महाराष्ट्रात सर्वाधिक १८ जणांचा मृत्यू** ▶ **गुजरात सरकारने म्हटले ; कोविडशी लढण्यास तयार** ▶ **कर्नाटकात आणखी २ रुग्णांचा मृत्यू** ▶ **नागरिकांना सतर्कतेचा सरकाकडून इशारा**

पुण्यभूमी प्रतिनिधी

नवी दिल्ली: देशात दररोज कोरोना विषाणूचे सुमारे ४०० नवीन रुग्ण आढळत आहेत आणि ५-६ रुग्णांचा मृत्यू होत आहे. गेल्या ८ दिवसांत कोरोना विषाणूच्या ३०४५ रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. ५२ मृत्यू झाले आहेत.३० मे रोजी, आरोग्य विभागाने देशात २७१० सक्रिय रुग्ण आणि ७ मृत्यूची नोंद केली होती. ७ मे रोजी ही संख्या ५७५५ वर पोहोचली, तर ५९ रुग्णांचा मृत्यू झाला. शनिवारी कर्नाटकात आणखी २ रुग्णांचा मृत्यू झाला. गुजरातमध्ये १८३, महाराष्ट्रात ८६ आणि कर्नाटकात ५७ कोरोनाचे नवीन रुग्ण आढळले. अशाप्रकारे, सक्रिय रुग्णांची संख्या ६०८१ वर पोहोचली आहे आणि मृतांचा आकडा ६१ वर पोहोचला आहे.



राज्यात वेगाने वाढणाऱ्या प्रकरणांदरम्यान, गुजरात सरकारने म्हटले आहे - आम्ही कोविडशी लढण्यासाठी पूर्णपणे तयार आहोत. रुग्णालयांमध्ये बेड, व्हेंटिलेटर आणि आयसीयू बेडची व्यवस्था करण्यात आली आहे. आरोग्यमंत्री ऋषिकेश पटेल म्हणाले- सध्याचा ओमिक्रॉन विषाणू हा कोविड कुटुंबातील आहे, परंतु तो इतका गंभीर नाही. आपण कोणत्याही परिस्थितीवर नियंत्रण ठेवू शकतो.

केरळ: आरोग्य विभागाने रुग्णालयांना कोविड-१९ आणि इन्फ्लूएंझाची लक्षणे असलेल्या रुग्णांवर उपचार करताना जून २०२३ मध्ये जारी केलेल्या कोविड मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. रुग्णालयांमध्ये प्रत्येकाने मास्क घालणे अनिवार्य आहे. तसेच, सर्दी, खोकला आणि ताप यांसारखी लक्षणे असलेल्या रुग्णांसाठी कोविड चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे.

महाराष्ट्र: राज्य सरकारच्या मते, जानेवारीपासून राज्यात एकूण १७ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी १६ जणांना इतर आजारांनीही ग्रासले होते. या वर्षी आतापर्यंत १३,७०७ नमुन्यांची चाचणी घेण्यात आली आहे. त्यापैकी १०६४ जणांना कोविड पॉझिटिव्ह आढळले.

गुजरात: सरकारी आकडेवारीनुसार, ५०८ कोरोना रुग्णांपैकी १८ जण रुग्णालयात दाखल आहेत, तर ४९० जणांवर घरीच आयसोलेशनमध्ये उपचार सुरू आहेत. प्रेस रिलीजमध्ये म्हटले आहे की, कोविड-१९ च्या प्रकरणांमध्ये सामान्यतः ६ किंवा ८ महिन्यांत वाढ दिसून येते. याबद्दल घाबरून जाण्याची गरज नाही.

कर्नाटक: गुलबर्गा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसने २५ खाटांचा कोविड वॉर्ड उभारला आहे. यापैकी पाच खाटा आयसीयू (व्हेंटिलेटरसह), उच्च अवलंबित्व युनिटसाठी आणि पाच गर्भवती महिलांसाठी आहेत. उर्वरित १० सामान्य खाटा आहेत.

उत्तराखंड: राज्य सरकारने बुधवारी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आणि जिल्हा प्रशासनाला रुग्णालयांमध्ये ऑक्सिजन आणि आवश्यक औषधांची उपलब्धता सुनिश्चित करण्यास सांगितले. याशिवाय, इन्फ्लूएंझा, गंभीर श्वसन संसर्ग आणि कोविड प्रकरणे यासारख्या आजारांची नोंद करण्यासाठी देखील सूचना देण्यात आल्या आहेत.

सिक्कीम: राज्याचे आरोग्यमंत्री जी.टी. ढुंगेल म्हणाले की, २९ मे पासून राज्यात ५२६ नमुन्यांची चाचणी घेण्यात आली आहे. त्यापैकी १५ जण पॉझिटिव्ह आढळले. यानंतर, कोविड प्रोटोकॉलचे पालन करून, सर्व रुग्णालयांमध्ये मास्क घालणे आणि सॅनिटायझर वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे.

हिमाचल प्रदेश: राज्यात कोविडचा पहिला रुग्ण आढळल्यानंतर, ४ जून रोजी रुग्णालयात प्रत्येकासाठी मास्क घालणे सक्तीचे करण्यात आले. ३ जून रोजी सिरमौर जिल्ह्यातील नाहन येथे पहिला रुग्ण आढळला.

भारतात कोविड-१९ चे ४ नवीन प्रकार आढळले भारतातील अनेक राज्यांमध्ये कोविड-१९ च्या रुग्णांमध्ये वाढ होत असताना, देशात चार नवीन प्रकार आढळून आले आहेत. आयसीएमआरचे संचालक डॉ. राजीव बहल म्हणाले की, दक्षिण आणि पश्चिम भारतातून अनुक्रमित केलेले प्रकार डऋ७, दत्रऋ, गछ.१ आणि छइ.१.८.१ मालिकेतील आहेत.

उर्वरित ठिकाणांहून नमुने गोळा केले जात आहेत आणि नवीन प्रकारांची तपासणी करण्यासाठी त्यांचे क्रमवारी ▶ पान २ वर

## मत चोरीचा पॅटर्न राबवण्याचे षडयंत्र

**राजकीय:काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांचाआरोप**

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतदान चोरीचा पॅटर्न आगामी बिहार विधानसभा निवडणूक, मुंबई महानगरपालिका निवडणूक तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतही वापरण्याचे षडयंत्र असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज केला.लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा गेल्या वर्षी राज्यात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील वाढीव मतदानाबाबतचा लेख शनिवारच्या विविध वर्तमानपत्रात प्रकाशित झाला आहे. या पार्श्वभूमीवर आज पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ यांनी भाजप आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर निशाणा साधला. राहुल गांधींच्या लेखाने राजकीय भूकंप झाला असून महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील फिक्सिंगची चौकशी का करत नाही? असा सवाल त्यांनी केला.



निवडणूक आयोगाची विश्वासार्हता आणि लोकशाहीवरील घाला या प्रश्नावर जनजागृती करण्यासाठी काँग्रेसच्या वतीने येत्या १२ जून रोजी राज्यभर मशाल मोर्चा काढण्यात येणार आहे. गडचिरोली येथील मोर्चात आपण सहभागी होणार असल्याचे सपकाळ यांनी सांगितले. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये ▶ पान २ वर

### लोकशाहीवरील गंभीर मुद्दा

राहुल गांधी यांनी महाराष्ट्रातील मतदानाच्या घोटाळ्याचा प्रश्न आकडेवारीसह मांडला आहे. हा आरोप नाही तर तथ्य आणि आकडेवारीसह त्याची मांडणी करून चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. हा लोकशाही व्यवस्थेवर निर्माण झालेला गंभीर आणि चिंताजनक मुद्दा आहे. काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने निवडणूक आयोगाकडेही हा मुद्दा सविस्तरपणे मांडला. पण त्यांनी खुलासा करून वस्तुस्थिती मांडण्याची गरज असताना त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर नियमातच बदल करून व्हिडीओ रेकॉर्डिंग आणि सीसीटीव्ही फुटेज तसेच माहिती देता येणार नाही, असा नवा फतवा काढला आहे. हा लोकशाहीवरचा घाला असून काही गौडबंगाल नाही तर माहिती का लपवली जात आहे?असा प्रश्न हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी उपस्थित केला.

## कासारी जवळ कार आडवी लावून आईसह मुलाला मारहाण

**जमिनीच्या वादातून घडली घटना १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल**

पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टी :जमिनीच्या वादातून ३ जून रोजी झालेल्या भांडणाबाबत आईने आष्टी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर सायंकाळी बीड-अहिल्यानगर रस्त्यावर कासारी येथे चारचाकी आडवी लावत आई सह मुलाला जबरदस्त मारहाण केली. शिवाय अंगावरील सोन्याचे दागिने, दहा हजार रुपये रोख, मोबाईल काढून घेत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

आष्टी तालुक्यातील कडा येथील सुमित ढोबळे यांची चोभानिमगाव येथे शेतजमीन आहे. शेजारी महादेव नरवडे याचीदेखील जमीन आहे. जमिनीच्या बांधासह रस्त्यावरून त्याचबरोबर वेगवेगळे कारण काढून सतत भांडण करत असल्याने ३ जून रोजी झालेल्या भांडणाबाबत सायंकाळी साडेपाचच्या सुमारास तक्रार देऊन कारने सुमित, त्याची आई व भाऊ असे तिघेजण कडा गावाकडे जात होते. अंदाजे पावणेसहा ते सहा वाजण्याच्या ▶ पान २ वर

## एसटी महामंडळाचे खासगीकरण ?

**निर्णय:मंत्री प्रताप सरनाईकांचे संकेत**

पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:महाराष्ट्रातील एसटी महामंडळाचे खासगीकरण होण्याची शक्यता आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तसे संकेत दिले आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) जागांचा व्यावसायिक विकास करून उत्पन्नवाढीचा नवा मार्ग शोधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये बसस्थानक आणि आगार परिसराचा समावेश असून, त्यांचा विकास सार्वजनिक-खासगी भागीदारी पद्धतीने करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विविध शहरांमध्ये बसस्थानक व बस आगार परिसर स्वरूपात जागा आहेत. अशा जागांचा विकास करून महामंडळ उत्पन्नाचे स्रोत निर्माण करू शकते. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी) पद्धतीने अशा जागांचा व्यावसायिक स्वरूपात विकास करण्यात यावा. यामधून महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यात यावे, अशा सूचना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिल्या.मुंबईतील एसटी महामंडळाच्या मुख्य कार्यालयात आयोजित बैठकीत हा प्रस्ताव सादर करण्यात आला. या अंतर्गत राज्यातील ७२ पॅकेजेसमध्ये एसटीची शहरी, ▶ पान २ वर

## पेरणीपूर्व तयारीत शेतकरी मग्न

**हंगाम:रेगूटीसोबत खत पेरणीची लगबग**

पुण्यभूमी प्रतिनिधी

सिरसाळा:खरिपाची पेरणी पुर्व शेत मशागत कामे उरकली आहेत परंतु शेतकरी राजा आता कापुस लागवडीच्या तयारीत आहे . यासाठी लागवड पुर्व तयारी सुरू आहे. सिरसाळा भागात अनेक शेतकरी मशागत केलेल्या शेतात कापुस लागवड करण्यासाठी रेगूटी ओढत आहेत सोबत खत पेरणी देखील करत. कापुस लागवडी वर शेतकऱ्यांवर भर असल्याचे दिसत आहे . सोयाबीन पिकाला कवडीमोल भाव आहे,उत्पादन ▶ पान २ वर



## महाराजांना दिली जिवे मारण्याची धमकी !

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज : संत एकनाथ महाराज मठ संस्थानच्या व्यवहारात भ्रष्टाचार प्रकरणी उपोषण का केले ? या कारणा वरून मठाचे उत्तराधिकारी असलेल्या महाराजांना चक्क अध्यक्ष आणि सचिवासह चौघांनी शिवीगाळ करून जीवे मारण्याचा धमकी दिली आहे. या प्रकरणी चौघा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील सासुरा येथील एकनाथ महाराज मठ संस्थांचे उत्तराधिकारी म्हणून काम करीत असलेले ह.भ.प. केशव महाराज शास्त्री हे या मठाचे अध्यक्ष आणि सचिव यांनी केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याच्या मागणीसाठी दि. ४ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषणाला बसले होते. याचा राग मनात धरून दि. ७ जून रोजी सकाळी ९:०० वा. च्या सुमारास मठाचे समोर एकनाथ महाराज मठसंस्थान सासुराचे अध्यक्ष रतन दत्तात्रय मुंडे व सचिव सुशेन रामराव भोसले आणि त्यांचे भाऊ राजेन रामराव भोसले व ज्ञानेश्वर रामराव भोसले यांनी केशव महाराज शास्त्री यांना तू भ्रष्टाचारा बाबत उपोषण का केलेस ? तुला बघावे लागेल असे. म्हणुन शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. ह.भ.प. केशव महाराज शास्त्री यांच्या तक्रारी वरून रतन ▶ पान २ वर

**परळीत कार्यशाळा** | **चाकरवाडी येथे संत महंतांच्या आशीर्वादाने व्यासपीठ पूजन**

# मराठवाड्यातील सर्वात मोठी शिवमहापुराण कथा

चाकरवाडी / प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज यांच्या पंचेविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्यास तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य महादेव महाराज तात्या श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताहाची सुरवात श्री माऊली दादाच्या समाधी पूजन, अभिषेकने शनिवारी सुरुवात करण्यात आली. यानंतर भव्य ग्रंथ दिंडीची विविध वाद्य सह मिरवणूक काढण्यात आली असून मराठवाड्यातील सर्वात मोठ्या शिवपुराण कथेची आज पासून सुरुवात होणार आहे.



अखंड हरिनाम सप्ताहाच्या निमित्ताने मुख्य कार्यक्रम व्यासपीठ पूजन करण्यात आले. यात मंगल कलश स्थापना, दीप प्रज्वलन, टाळ, मृदुंग, वीण, श्रुती पूजन, ध्वजारोहण, मुख्य संत महंतांच्या तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह.भ.प. महादेव महाराज (तात्या) यांच्या हस्ते करण्यात आले. श्री ह.भ.प.नारायण महाराज भाऊ, शांतीब्रम्ह गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज, श्री क्षेत्र गोरखनाथ टेकडी, श्री ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री बंकटस्वामी मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनुर, श्री ह.भ.प.रामकृष्ण रधवे बापू ,श्री ह.भ.प.उद्धव बापू आपेगावकर, श्री ह.भ.प.पंडित महाराज गिरी , विश्वनाथ अप्पा स्वामी कपिलधर, श्री ह.भ.प.डॉ प्रशांत स्वामी, ज्ञानेबा माऊली महाराज श्री क्षेत्र बरड, श्री ह.भ.प.नाना महाराज कदम, श्री ह.भ.प. सुरेश महाराज जाधव, दत्तात्रय मिसळ महाराज यांच्या हस्ते मुख्य व्यासपीठ पूजन करून अखंड हरिनाम सप्ताह सुरवात करण्यात आली, यानंतर ज्ञानेश्वरी पारायण श्री ह.भ.प. रमाबुवा महाराज काजळे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले. गाथा भजन श्री ह.भ.प.ओंकार महाराज जगताप, श्री ह.भ.प.संजय देवकर, श्री ह.भ.प.मनोहर मुंडे, श्री ह.भ.प.भारतबुवा पठाडे, कंठभूषण श्री अभिमन्यु ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आले. अतिशय उत्सवात माऊली ▶ पान २ वर

## . आता .तरी प्रकाश आंबेडकराना समजून घ्या

**अजय सरवदे:परिसंवाद मेळाव्यास उपस्थित रहा**

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:महाराष्ट्राच्या राजकारणात २०१९ साली वंचित बहुजन आघाडी या पक्षाने उडी घेतली अन् प्रस्थापितांच्या उरात धडकी भरवत ४४ लाख मतदान लोकसभेला मिळविले विधानसभेला तो टक्का कमी कमी होत गेला याचे एकमेव मुख्य कारण म्हणजे काही स्वयंघोषित बुद्धिजीवी विचारवंत यांनी प्रस्थापितांच्या हाताला धरत त्यांच्याकडून गाड्या पैसे घेत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांनी घेतलेले निर्णय भूमिका प्रयोग हे चुकीचे आहेत याचा अपप्रचार सुरू केला आणि मतदार दुरावत गेला.



वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या संकल्पनेतून आता तरी प्रकाश आंबेडकरांना समजून घ्या या परिसंवाद मेळाव्याचे आयोजन केले असून फुले आंबेडकरी विद्वत सभेचे मा.भास्कर भोजने यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. या कार्यक्रमास वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय सदस्य महासचिव तथा जिल्हा प्रभारी प्रा. किसन चव्हाण, तक्रार निवारण समितीचे प्रमुख प्रा. विष्णू जाधव यांच्यासह आजी-माजी जिल्हा, तालुका, ▶ पान २ वर

## आपले ठेवायचे झाकून

तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोइत्रा आणि बीजेडीचे माजी खासदार पिनाकी मिश्रा यांच्या ३ मे रोजी जर्मनीत झालेल्या लग्नाची बातमी आल्यासरशी अनेक समाजमाध्यमी वीर आणि वीरांगना नेहमीप्रमाणे एकदम चेकाळून गेले. आता ते चेकाळले आहेत, असे म्हणणे हे पीतांबर पिवळा आहे, असे म्हणण्यासारखेच. कारण हातात मोबाइल नामक सहज उपलब्ध होणारे यंत्र, स्वस्तात उपलब्ध होणारा डेटा आणि डोक्यात राष्ट्रवादापासून सांस्कृतिक वर्चस्ववादापर्यंतच्या साऱ्याचा भुसा भरलेला असेल तर कुणाबद्दलही, कशाबद्दलही, कुठेही आणि काहीही प्रतिक्रिया द्यायचा अधिकार आपल्याला प्राप्त होतो असा या मंडळींचा समज असल्याने त्यांना चेकाळण्यासाठी कोणतेही निमित्त पुरते. त्यात ती व्यक्ती सार्वजनिक पातळीवर प्रसिद्ध असेल तर तिची नैतिकता तपासण्याचा आपल्याला जणू मक्ताच मिळाला आहे असे या समाजमाध्यमी मंडळींना वाटते. त्यामुळे आता पन्नाशीत लग्न कशाला करायचे, त्याचा काय उपयोग, इथपासून तऱ्हेतऱ्हेच्या टिप्पण्या केल्या गेल्या. त्यापैकी बऱ्याच हीन पातळीवरच्या, कुचाळक्या करणाऱ्याच होत्या. सार्वजनिक पातळीवर प्रसिद्ध असलेल्या व्यक्तीला आजकाल ट्रोलिंग वगैरेला सामोरे जावेच लागते, पण एखादी गोष्ट विनोदाने घेणे, गंमत करणे यातली सीमारेषा ओलांडून ट्रोलिंग होते, तेव्हा ते त्या समाजाची यत्ता दाखवणारे असते.

खरे तर महुआ मोइत्रा आणि पिनाकी मिश्रा या आजीमाजी खासदारांनी वैयक्तिक आयुष्यात काय करावे हा सर्वस्वी त्यांचा प्रश्न. त्यांनीच कशाला, इतर कोणीही कायद्याच्या चौकटीत राहून आपल्या वैयक्तिक आयुष्यात काय करावे याच्याशी इतरांना काही देणेघेणे असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. कोणाही प्रसिद्ध व्यक्तीच्या वैयक्तिक पातळीवरील वागण्याचा सामाजिक पातळीवर उपद्रव होत नाही, तोपर्यंत कोणालाही त्याबाबत बोलायचा काहीही अधिकार नाही. तरीही महुआ मोइत्रा यांच्या या लग्नाबाबत समाजमाध्यमांवर ज्या प्रतिक्रिया उमटल्या, आजच्या भाषेत ट्रोलिंग झाले, ते 'दगड कुणी मारायचा' या गोष्टीची आठवण करून देणारे होते. यापलीकडे जाऊन इतरांच्या लग्नामध्ये नाक खुपसताना आपल्या आसपास लग्नसंस्थेचे काय चालले आहे याचा आपण कधी गांभीर्याने विचार करणार?

अगदी ताजे असलेले वैष्णवी हगवणे प्रकरण हे आपल्या लग्नसंस्थेचे काय झाले आहे याचे दुर्दैवी उदाहरण. सासरच्या लोकांच्या पैशांच्या हव्यासापोटी एक तरुण मुलगी जिवानिशी जाते, पण तिच्या लग्नात दिल्या गेलेल्या भेटवस्तू, केला गेलेला खर्च यात काही चुकीचे आहे, असे तिच्या घरच्या लोकांना चुकूनही वाटत नाही. उलट ते प्रेमविवाहावरच खापर फोडत राहतात. आजही अनेक पालकांना त्यांच्या मुलाने किंवा मुलीने स्वत:साठी निवडलेला जोडीदार जात, धर्म, वर्ग या सगळ्या चौकटीत बसणाराच असावा लागतो. तसे नसेल तर त्या जोडप्याला एक तर अनेक दिव्यांमधून जावे लागते, नाही तर त्याचा हात सोडून द्यावा लागतो. लग्न कुणाशी करायचे याचा आजही अनेक तरुण/तरुणींना आपापला निर्णय घेता येत नाही. त्यासाठी ते पालकांवर, वधू-वर संशोधनाच्या पारंपरिक पद्धतीवरच अवलंबून असतात. लग्नानंतरही त्या जोडप्याचे एकमेकांशी कसे काय जमते यापेक्षाही ते लग्न टिकण्यात वा मोडण्यात त्यांच्या पालकांचाच मोठा हात असतो. पण रूढीपरंपरा जिवापाड पाळण्याच्या नादात ही पालकमंडळी कोणत्याही जोडप्याने लग्न कशासाठी करायचे या मूळ हेतूलाच हरताळ फासताना दिसतात. आजघडीच्या पिढीच्या जीवनातील गरजा, ताणेबाणे यांचा फारसा विचार न करता आहे ती व्यवस्था टिकवून ठेवण्याचा अट्टहास लग्नव्यवस्थेला अधिकाधिक कर्मठ बनवतो आहे. अशा कर्मठ व्यवस्थेला धडका मारण्याचे प्रयत्नही तितक्याच जोमाने होतात. राज्यव्यवस्थेने कितीही निर्बंध आणायचे प्रयत्न केले तरी लग्नव्यवस्थेचे साचे मोडू पाहणाऱ्या आणि त्यासाठी 'लिव्ह इन'मध्ये राहू पाहणाऱ्या जोडप्यांचे वाढत चाललेले प्रमाण हे याचेच उदाहरण. पण जात, धर्म यांच्या पलीकडे जाणारे आणखी किती तरी साचे या व्यवस्थेने घडवलेले आहेत. अमका रंग, वय, गाव, शहर, व्यवसाय अशा कोणत्याही गोष्टी एकमेकांशी जुळणाऱ्या नसतील तर कान आणि डोळे टवकारले जातात. या सगळ्यात एक बाब अनेकदा बाजूला टाकली जाते ती त्या दोन जिवांमधली 'केमिस्ट्री'.

लग्न करण्यामागे वंशसातत्य राखणे या कोणत्याही जीवाच्या आदिम प्रेरणेबरोबरच स्वत:चे कुटुंब उभारणे, सहजीवनासाठीचा जोडीदार मिळवणे, आयुष्यात स्थिरस्थावर होण्याची सुरुवात करणे अशी अनेक कारणे असतात, हे खरे असले तरी या कारणांपलीकडे जाऊन कोणाही दोन जीवांना एकत्र यावे, आपले दोघांचे सहजीवन असावे असेही असू शकतेच. मुख्य म्हणजे ते वयाच्या कोणत्याही टप्प्यावर वाटू शकते. असे वाटणारी जोडपी एकत्र येतातही. पण लग्न करायचे ते फक्त मूल जन्माला घालण्यासाठी असे ज्यांना वाटते, त्यांनाच या लग्नाचा काय उपयोग असा प्रश्न पडू शकतो. त्यांना सहजीवन ही संकल्पनाच समजलेली नसते, असे म्हणावे लागते. दोन जीवांना असोशीने एकत्र आणणारी 'केमिस्ट्री' अनाकलनीय अशा जोड्या जमवू शकते. ज्यांना स्त्रीपुरुष या पारंपरिक सहजीवनाकडे खुलेपणाने बघता येत नसेल, तर ते समलिंगी सहजीवनाकडे कसे पाहतील हे वेगळे सांगायला नको.लग्नसंस्था आणि पुढे तिचीच पोटउपज असलेली कुटुंबव्यवस्था हा भारतीय संस्कृतीचा कणा आहे, असे सांगितले जाते आणि तिची आताची स्थिती तशीच राहावी असा आग्रह धरला जातो. पण हीच व्यवस्था काळानुरूप कशी बदलत गेलेली आहे, हे किती जणांना माहीत असते? इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास हे पुस्तक विवाहसंस्थेच्या परिवर्तनशीलतेचा आलेख तर मांडतेच, शिवाय मानवसमूह सामाजिक, सांस्कृतिक पातळीवर स्थित्यंतराच्या किती टप्प्यांमधून गेला आहे, याचे त्यातून होणारे दर्शन दिङ्मूढ करणारे आहे. केवळ लग्नासारख्या सामाजिक रूढीबाबतच नाही तर इतरही अनेक प्रथापरंपरांबाबत १००-२०० वर्षांच्या आगेमागे दिसणाऱ्या गोष्टींना कवटाळून त्या अपरिवर्तनीय मानणे हे किती खुळचटपणाचे आहे, हे विवाहसंस्थेचा इतिहास बघितला तर समजते.

# 'सर्वोत्कृष्ट लोककलावंत' पुरस्कार

## अभिनंदनिय:डॉ.गणेश चंदनशिवेंना मिळाला पुरस्कार



पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबई:विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे प्रमुख,लोककलेचे संशोधक आणि सुप्रसिद्ध सिने-पार्श्वगायक डॉ. गणेश चंदनशिवे यांना अखिल भारतीय नाट्य परिषदेचा अत्यंत प्रतिष्ठेचा 'सर्वोत्कृष्ट लोककलावंत' पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. लोककला क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाची ही एक मोठी पावती मानली जात आहे.

हा पुरस्कार सोहळा दिनांक १४ जून २०२५ रोजी मुंबई येथे नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. यावेळी डॉ. गणेश चंदनशिवे यांना हा बहुमान प्रदान करण्यात येईल.

डॉ. चंदनशिवे यांनी लोककलेच्या जतन आणि प्रसारात मोलाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्यामुळे लोककलांना शहरी आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर एक नवी ओळख मिळाली आहे. एक गायक म्हणून त्यांनी आपल्या आवाजातून अनेक लोकगीते,चित्रपट गीते घराघरात पोहोचवली आहेत, तर मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीचे प्रमुख म्हणून त्यांनी अनेक नवोदित कलाकारांना मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे लोककलांना शैक्षणिक आणि व्यावसायिक मंच प्राप्त झाले आहे.यापूर्वीही लोककलेच्या क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल डॉ. चंदनशिवे यांना अनेक मानसन्मान प्राप्त झाले आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषदेचा हा पुरस्कार त्यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. लोककला क्षेत्रासाठी ही एक अभिमानाची बाब मानली जात आहे. या घोषणेनंतर सर्व स्तरांतून डॉ. गणेश चंदनशिवे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पोलिसांचा धडाकेबाज कारवाई

## अट्टल दरोडेखोर जेरबंद, एक फरार

पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई : गेवराई पोलिसांनी रात्रगस्ती दरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे नागझरी पारधी वस्तीवर छापा टाकून सराईत दरोडेखोर भगवान ईश्वर भोसले , रा. बेलगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर याला अटक केली. त्याचा साथीदार मात्र अंधाराचा फायदा घेत पसार झाला. पोलिसांनी त्याचा पाठलाग केला, परंतु तो हाती लागला नाही. भगवानवर अहमदनगर आणि सोलापूर येथील पोलीस ठाण्यांत दरोडा आणि घरफोडीचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याने करमाळा (जि. सोलापूर) येथील घरफोडीची कबुली दिली. याप्रकरणी त्याच्यावर करमाळा पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ४३८/२०२५, कलम ३३१(७), ३(५) भारतीय दंड संहिता अंतर्गत गुन्हा दाखल आहे. त्याला पुढील तपासासाठी करमाळा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.ही धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मिना यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांच्या पथकाने केली. पथकात मपोउपनि निशीगंधा खुळे, पोउपनि राम खोत, श्रीमंत उबाळे, सुरेश पारधी, पोह अशोक हंबर्डे, चंद्रसेन माळी, मुकुंद रोकडे, जयराम उबे आणि होमगार्ड्स यांचा समावेश होता.

# आरटीओ कार्यालयात बनावट कागदपत्रांआधारे उतरवले वाहनावरील कर्ज

अंबाजोगाई/प्रतिनिधी: फायनान्स कंपनीकडून कर्ज काढून वाहन घेतले परंतू कर्जाची परतफेड न करताच बनावट कागदपत्रे तयार केली. वाहनावर कर्ज नसल्याचे दाखवून फायनान्स कंपनीचे बनावट ना हरकत पत्र तयार केले. त्या आधारे आरटीओ कार्यालयातून त्याच्यावरील कर्जाचा बोजा उतरवला. वाहनाची विक्री केल्याचा प्रकार अंबाजोगाईत समोर आला.

अंबाजोगाई आरटीओ कार्यालयातील कर्मचारी अशोक बोलचेटवार यांनी या प्रकरणी तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीनुसार, सौदागर दत्तू सोनवणे (रा. सोमनवाडी, ता. अंबाजोगाई) यांनी वाहन (एमएच ४४ यू २९५३) घेतले होते. या वाहनावर चोलामंडलम या खासगी फायनान्स कंपनीच्या लातूर शाखेकडून कर्ज घेतले होते. २० जानेवारी २०२५ रोजी सौदागर सोनवणे यांनी या वाहनावरील कर्ज बाकी नसल्याचे फायनान्स कंपनीचे बनावट पत्र, सही शिक्के मारून आरटीओ कार्यालयात दिले. त्या आधारे वाहनावरील कर्जाचा बोजा उतरवून घेतला. त्यानंतर हे वाहन ठाणे जिल्ह्यात विक्री केले. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर आरटीओ विभागाने पोलिसांत तक्रार दिली. यावरून वाहन मालक सौदागर दत्तू सोनवणे आणि हा प्रकार करण्यासाठी मदत करणारा पीयूसी सेंटर चालक सलीम शेख या दोघांविरोधात अंबाजोगाई ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

# बांधावरून दाम्पत्यांसह मुलींना मारहाण ; तिघांवर गुन्हा

केज : शेताच्या बांधाच्या कारणावरून एका दाम्पत्यांसह दोन मुलींना लोखंडी रॉड व गॅस पाईपने बेदम मारहाण केल्याची घटना सोमनाथ बोरगाव (ता. अंबाजोगाई) येथे घडली. याप्रकरणी युसुफवडगाव पोलिसात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

सोमनाथ बोरगाव येथील सविता बंडू गिरी या पती, दोन मुली व एक मुलासह वास्तव्यास असून त्यांना १ एकर ३५ गुंठे जमीन आहे. ५ जून रोजी रात्री १०.३० वाजता ते घरी असताना त्यांच्या भावकीतील बालाजी विकास गिरी, विकास रंगनाथ गिरी व विकास गिरीचा जावई नागनाथ भारती (रा. मांडेखेल ता. परळी) हे तिघे त्यांच्या घरामध्ये आले. त्यांनी तुम्ही आमचा बांध कोरायचा नाही, तो पूर्ण बांध आमच्या शेतामध्ये येतो अशी भांडणाची कुरापत काढून शिवीगाळ करु लागले. त्यांनी आम्ही तुमचा बांध काढला नाही, तुम्ही आम्हाला शिव्या का देता असे म्हणताच बालाजी याने बंडू गिरी यांना घराबाहेर ओढुन आणून लोखंडी रॉडने सविता गिरी यांच्या डोक्यात मारुन डोके फोडत गंभीर जखमी केले. नागनाथ याने गॅसच्या पाईपने पाठीवर मारहाण केली. यावेळी बंडू गिरी आणि त्यांच्या मुली सुप्रिया, गायत्री हे भांडण सोडवू लागल्याने त्यांना गॅसच्या पाईपने व चापटाबुक्याने मारहाण केली. शेजारच्या लोकांनी त्यांचे भांडण सोडविल्यानंतर ते जीवे मारण्याच्या धमक्या देऊन निघून गेले. अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात उपचार घेऊन सविता गिरी यांनी दिलेल्या तक्रारीवरून बालाजी गिरी, विकास गिरी, नागनाथ भारती या तिघांविरुद्ध युसुफवडगाव पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार अरुण मोरे हे करीत आहेत.

## पान एक वरून

**आठवड्यात कोरोनामुळे ५० मृत्यू**

लावली जात आहे. प्रकरणे फार गंभीर नाहीत आणि लोकांनी काळजी करू नये, फक्त सावधगिरी बाळगावी. जागतिक आरोग्य संघटनेने (थक्ज) देखील त्यांना चिंतेचे मानले नाही. तथापि, त्यांना देखरेखीखाली असलेल्या प्रकारांमध्ये वर्गीकृत केले आहे. चीनसह इतर आशियाई देशांमध्ये कोविडच्या वाढत्या प्रकरणांमध्ये हा प्रकार दिसून येत आहे.

**मत चोरीचा पॅटर्न राबवण्याचे**

मतदानाची चोरी करून भाजप युती सरकार सत्तेत आले. अचानक वाढलेले मतदान हे अनौरस, बोगस असल्याने काँग्रेस पक्षाने या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली. पण चौकशी काही केली जात नाही. राहुल गांधी यांनी संसदेत आणि संसदेबाहेरही हा प्रश्न लावून धरला आहे. आज देशभरातील प्रमुख वर्तमानपत्रात त्यांचा या विषयावर लेख प्रकाशित झाल्याने या निवडणूक फिक्सिंगच्या चौकशीची मागणी होत आहे, असे सपकाळ म्हणाले.

**कासारी जवळ कार आडवी**

सुमारास ते कासारी गावच्या नदी पुलावरून जात असताना एक चारचाकी गाडी समोरून आली. त्यांनी सुमितच्या कारला आडवी लावून अडवले. त्यानंतर जीपमधून उतरलेल्या सहा जणांनी हातात लोखंडी गज, लाकडे दांडे घेऊन कारच्या काचा फोडल्या. त्याचवेळी तीन दुचाकींवरून नऊ अनोळखी लोक आले. हातात लोखंडी गज घेऊन तू निखिल नरवडे, महादेव नरवडे यांच्याविरुद्ध आईला पोलिस ठाण्यात घेऊन जात तक्रार का केली? असे म्हणत सुमित, त्याचा भाऊ अमित, आई शारदा यांनाही लोखंडी गज, लाकडी दांड्यांनी मारहाण करून जखमी केले. त्यानंतर योगेश मुटकुळे याने माझ्या गळ्यातील सोन्याची सहा तोळ्याची चेन व उजव्या हाताच्या बोटामधील एक तोळ्याची अंगठी, खिशातील दहा हजार रुपये व आई शारदा हिच्या गळ्यातील तीन तोळ्याचे सोन्याचे मिनी गंथन, एक मोबाईल बळजबरीने काढून घेतला व आरोपींनी मिळून तुम्ही पुन्हा निखिल नरवडे, महादेव नरवडे यांच्या नादी लागलात तर तुम्हाला शेतात जाऊ देणार नाही, अशी धमकी देऊन शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली, असे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी योगेश रामेश्वर मुटकुळे, प्रवीण आबासाहेब श्रीखंडे, अमोल बबन दरेकर, सुरज पवार, अक्षय पवार, बंडू पवार व नऊ अनोळखी व्यक्तींविरुद्ध ५ जून रोजी आष्टी पोलिस ठाण्यात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास आष्टी पोलीस करीत आहेत.

**एसटी महामंडळाचे**

निमशहरी आणि ग्रामीण जागा मॉडेलप्रमाणे समाविष्ट केली जाणार आहेत. जागांचे अ, ब आणि क वर्गांमध्ये वर्गीकरण करून त्याचे एकत्रित पॅकेज तयार केले जाणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, 'एसटी'च्या राज्यातील जागांचा विकास करताना स्थानिक परिस्थिती, व्यावसायिक लाभ आदी बाबी लक्षात घेण्यात याव्यात. या जागांच्या विकासासाठी अ, ब आणि क असे वर्गीकरण करून त्यांचे एक पॅकेज करावे. ज्यामध्ये शहरी, निमशहरी आणि ग्रामीण जागांचा समावेश असावा. पॅकेजमधील मालमत्तेचे मूल्य त्याच पॅकेजमध्ये असावे. राज्यात ७२ पॅकेजेसमधून एसटी बसस्थानक, आगार आदींचा विकास करण्यात येणार आहे. पॅकेजमध्ये कामांबाबत सुधारणा करायची असल्यास सुधारणा करून घ्याव्यात. या कामाला गती देऊन तातडीने या संदर्भातील कार्यवाही पूर्ण करावी, असे निर्देशही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

**पेरणीपूर्व तयारीत शेतकरी**

खर्च देखील निघणे अवघड आहे म्हणून या वर्षी शेतकऱ्यांचा कापुस लागवडी वर अधिक भर आहे. मोदी सरकारने नुकतेच कापसास आठ हजार पार हमी भाव घोषीत केला आहे. हा भाव परवडणारा जरी नसला तरी किमान स्थिरता ठेवणारा आहे. यंदा कापुस प्रति बॅग ९०० रूपये एवढी आहे . २५ रुपयांनी दर वाढवले आहेत . याच बरोबर खतांच्या किमती देखील अवाच्या सव्वा वाढल्या आहेत,५० किलोची बॅग १७५० / - रूपयांना आहे. खत बियाणांची किंमत वाढल्याने याची आर्थीक झळ शेतकऱ्यांना बसणार आहे. वरुन राजा अद्याप बरसला नसल्याने शेतकरी प्रतिक्षेत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी कोरडवाहू शेती वरती धूळ पेरणी केली आहे. खत पेरणी करतांनाचे कोथरुळ भागातील घेतलेले छायाचित्र दिसत आहे.

**महाराजांना दिली जिवे मारण्याची**

दत्तात्रय मुंडे (रा. सासुरा ता. केज), सुशेन रामराव भोसले, राजेन रामराव भोसले आणि ज्ञानेश्वर रामराव भोसले तिघे (रा. खरडेवाडी ता. बीड) यांचे विरूध्द केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल उमेश आघाव हे तपास करीत आहेत.

**मराठवाड्यातील सर्वात मोठी शिवमहापुराण**

दादाच्या समाधी पूजन,ग्रंथ दिंडी, व्यासपीठ पूजन, संत ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन,या कार्यक्रमाने आज तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह.भ.प. महादेव महाराज तात्या चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शन करण्यात आले.

**आता तरी प्रकाश आंबेडकरांना**

शहर पदाधिकारी, कार्यकर्ते निवृत्त कर्मचारी अधिकारी हे उपस्थित राहणार आहे. बीड जिल्ह्यामध्ये राहणाऱ्या जनतेस वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी असे आवाहन केले आहे की परिसंवाद मेळाव्यास प्रचंड संख्येने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड येथे दिनांक ०८.०६.२०२५ रोजी ठीक १ वाजता उपस्थित राहावे असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## पान सहा वरून

**बिंदुसरा नदीने घेतला मोकळा**

स्वच्छतेमुळे पुराचा धोका अतिशय कमी झाला आहे. याबद्दल ना.अजिदादांचे बीडकर कायम ऋणी असतील अशी भावना आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

**कड्यामध्ये चोरट्यांचा**

पानाची टपरी फोडून चोरट्यांनी दहा हजाराच्या सिगारेट पाकिटांसह नगदी साडेआठ हजार लांबिवले. घटनास्थळी पीएसआय आजिनाथ काकडे यांनी भेट दिली. एकाच रात्री अनेक ठिकाणी दुकानफोडी झाल्यामुळे नागरिक भयभीत झाले असून पोलिसांनी चोरांचा बंदोबस्त करावा. अशी मागणी होत आहे.

**धर्मवीर क्रिकेट क्लबचा**

तोडकर दत्ता (सर) यांचा समावेश होता. सर्व खेळाडूंनी चोख कामगिरी करत विजयात मोलाचा वाटा मिळाला आहे. धर्मवीर प्रतिष्ठान, बालाघाट यांच्या माध्यमातून तयार झालेला हा संघ बाजीराव दादा चव्हाण मित्र मंडळाच्या सहकार्याने या स्पर्धेत सहभागी झाला होता. संघाच्या यशामागे बाजीराव दादा साहेबांचे प्रोत्साहन आणि नेतृत्व हे महत्त्वाचे ठरले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून धर्मवीर प्रतिष्ठान जिल्हाध्यक्ष लिंबाजी जाधव, डॉ. ज्ञानेश्वर जाधव, विलास मस्के, फुलचंद नेवाळे, ज्योतिराम फरताडे, अनिकेत कदम आणि गणेश नेवाळे उपस्थित होते. त्यांनी विजयी संघाचे अभिनंदन करत बाजीराव दादांचे कौतुक केले. राजकीय नेतृत्वाबरोबरच खेळ क्षेत्रातही बाजीराव दादा चव्हाण यांचे योगदान उल्लेखनीय ठरत आहे, हे धर्मवीर क्रिकेट क्लबच्या यशातून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

**नागसेन वसतीगृहात प्रवेश**

नानासाहेब बनकर, भास्कर मामा लिहिणार, ड. ठुबे,ड. भारतभूषण मौर्य, रिपाई नेते सुनील वाघमारे, बाळासाहेब केदारे, भाऊसाहेब जगदाळे, गणपत मोरे, संतोष तेलतुंबडे, माजी प्रभाकर खंडागळे, बन्सी भाऊ मोरे , सुरेश गायकवाड शिवम तेलतुंबडे आदींनी केले आहे.

**शिवसेना उबाठा गटाचा**

विक्रीवर बंदीची मागणी केली मोर्चात अवैध दारू विरोधात घोषणांनी परिसर दराने गेला.या एल्गार मोर्चा शिवसेनेचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, तालुकाप्रमुख ड दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, शहरउपमुख लूकमान कुरेशी, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे, शहरसंघटक तानाजी मापारी, गजानन बोरुडे, युवासेना शहरप्रमुख श्रीकांत मादनकर, अल्पसंख्यांकविभागचे अशपाक खान, इकबाल कुरेशी, फहीम खान, विभाग प्रमुख तानाजी अंभोरे, गोपाल मापारी, युवतीच्या सरपंच प्रयागबाई पाटोळे, तंटामुक्ती अध्यक्ष गोदावरीताई कायंदे, उपसरपंच रामेश्वर कायंदे, ग्रामपंचायत सदस्य दशरथ शिंदे, ज्योतीताई सरकटे, कुसुमताई टाकसाळकर, विश्रांती ताई अडागळे, कलीम कुरेशी, मंगेश मोरे, योगेश भूक्कन शमीम शेख विजय घोडके यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक महिला उपस्थित होत्या.

**ड्राय- डे-च्या दिवशी हॉटेलवर**

माहिती आधारे कडा पोलिसांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार तेथे छापा मारून एक हजार आठशे रुपये किमतीची देशी दारू जप्त करून संबंधित हॉटेलचालक शहादेव महाडिक यांच्याविरुद्ध मुंबई दारूबंदी अधिनियम कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोह सव्वाशे, पोह नवले, पोना आहेर, पोशी खोले आदि पोलीस कर्मचाऱ्यांनी कारवाई केलीआहे.

**वादळी पावसामुळे विद्युत**

शेताच्या परिसरात काही विद्युत खांब वाकले तर काही ठिकाणी विजेच्या तारा लोंबकळत आहेत. त्यामुळे या भागातील विजेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता शेतकरी व्यक्त करीत आहेत.शेतात वाकलेले विधुत खांब आणि लोंबकळणाऱ्या तारांमुळे शेतीची कामे करताना शेतकऱ्यांना भीती वाटतआहे. या खांब आणि तारांमुळे दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वीज महावितरणने तत्काळ दखल घेऊन कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

**ब्लॅक डायमंड अन् विश्वकर्मा**

सहाय्यक आणि कनिष्ठ अभियंता (सुव्यवस्था व संचलन), सर्व कर्मचारी (सुव्यवस्था व संचलन) आणि सर्व कंत्राटदार यांच्या अथक मेहनतीमुळेच हे यश प्राप्त झाले. या गौरव सोहळ्याला कंपनीचे संचालक (संचलन) संजय मारुडकर, प्रभारी संचालक (प्रकल्प) अभय हरणे, प्रभारी संचालक (खनिकर्म) राजेश पाटील, आणि संचालक विश्वास पाठक यांची प्रमुख उपस्थिती होती.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



# दुर्गाडी किल्ल्याचे प्रकरण पुरातत्व विभागाकडे

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याणातील इतिहास कालीन दुर्गाडी किल्याची संरक्षक भिंत बुधवारी पहाटे झालेल्या पावसात कोसळल्याची घटना घडली. या पुरातन ऐतिहासिक ठेव्याची जबाबदारी आपल्या अंगावरून झटकण्यात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पुरातत्व विभाग यांची जुपंली असल्याचे यानिमित्ताने समोर आले असून शासन अंग असलेल्या दोन्ही विभागाची टोलावा टोली पाहता, जबाबदार कोण असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या आरमारांची मुहूर्तमेढ कल्याणमधील दुर्गाडी किल्ला येथे रोवली. त्यामुळे ऐतिहासिक महत्त्व असलेले किल्ले दुर्गाडी हे लाखो शिवभक्तांचे श्रद्धा स्थान असून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करोडो रू. खर्च करून किल्याची डागडुजी तसेच बुरूजाचे काम, कमानीचे काम सुरू आहे.

किल्ल्याच्या समोरील बाजूस असलेली संरक्षक भिंत अवघ्या अर्ध्या तासाच्या पावसात बुधवारी पहाटे कोसळली. कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी अधिकार्यांना ठेकेदारा हलगर्जीपणा बाबत खडे बोल सुनावित धारेवर धरले. तर गुरुवारी खासदार सुरेश म्हात्रे यांनी दुर्गाडी किल्याच्या भिंतच्या ढासळलेल्या भागाची पाहणी करीत ठेकेदारावर कारवाईची मागणी केली. काळ्या यादीत टाकावे असेही म्हणाले. या घटनेत पुरातन ऐतिहासिक ठेव्याच्या जबाबदारी आपल्या अंगावरून झटकण्यात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पुरातत्व विभाग यांची जुपंली असल्याचे दिसून आले असतानाच, सार्वजनिक बांधकाम विभागाने उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी उपविभाग कल्याण यांना पत्र दिले आहे.

या पत्रात कल्याण येथील दुर्गाडी किल्ल्याच्या भोवती बांधण्यात आलेली संरक्षण भिंत कोसळल्या बाबत संरक्षण भिंतीचे काम हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन करण्यात आलेले नाही. सदरचे काम हे पुरातत्त्व विभागाकडून करण्यात आलेलं आहे. त्यामुळे या कोसळलेल्या संरक्षण भितीबाबत या विभागाकडून कोणतीही कार्यवाही होणे क्रमप्राप्त होत नाही. हे आपल्या माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर. अशा आशायाचे पत्र उपविभागीय अधिकारी सा. बां, उपविभाग क्रं 1कल्याण यांनी दिले असल्याने पुरातत्व विभागाकडे किल्ले दुर्गाडी भिंत कोसळल्याच्या घटना प्रकरण वळले असल्याचे दिसून येत आहे.

# घोडबंदर मार्गावर वाहतुकीत बदल

◆ **ठाणे(प्रतिनीधी) :**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या कामादरम्यान खांबावर गर्डर टाकण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामासाठी घोडबंदर मार्गावर पुढील चार दिवस मोठे वाहतूक बदल लागू करण्यात आले आहेत. मेट्रो प्रकल्पाच्या कामादरम्यान खांबावर गर्डर टाकण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामासाठी घोडबंदर मार्गावर पुढील चार दिवस मोठे वाहतूक बदल लागू करण्यात आले आहेत. कासारवडवली आणि कापुरबावडी भागात हे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे कासारवडवली भागात शुक्रवारी रात्री ११.५५ वाजता ते शनिवारी सकाळी ५ वाजेपर्यंत आणि कापुरबावडी भागात शनिवार रात्री ११ ते रविवार सकाळी १० वाजेपर्यंत आणि रविवार रात्री ११ ते सोमवार सकाळी ६ वाजेपर्यंत लागू असतील.

### कापुरबावडी भागातील बदल

प्रवेश बंद : ठाणे घोडबंदर स्लीप रोडवरुन कापुरबावडी सर्कल मार्गे घोडबंदरचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना कापुरबावडी सर्कल येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :** सदरच्या मार्गावरुन जाणारी सर्व प्रकारची वाहने ही कापुरबावडी सर्कल येथुन पुला खालुन नळपाडा सिग्नल येथुन उजवीकडे वळण घेऊन, नंदीबाबा चौक, ढोकाळी मार्गे इच्छित स्थळी जातील. सदर मार्गावरुन जाणारी सर्व प्रकारची वाहने ही रवि स्टील नाका येथुन डावे बाजुस वळण घेवुन पोखरण रोड नं.२,गांधी चौक येथून उजवे बाजुस वळण घेऊन खेवरा सर्कल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद :** नळपाडयातुन बाहेर येऊन तत्वज्ञान विद्यापीठ मार्गे घोडबंदरचे दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना नळपाडा पाईप लाईन येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :** सदर मार्गावरुन जाणारे सर्व प्रकारची वाहने नळपाडा पाईप लाईन येथुन यु टर्न घेऊन नळपाडा येथून इच्छित स्थळी जातील. हे वाहतूक बदल शनिवार रात्री ११ ते रविवार सकाळी १० वाजेपर्यंत आणि रविवार रात्री ११ ते सोमवार सकाळी ६ वाजेपर्यंत लागू असतील.

## मेट्रो प्रकल्पाच्या खांबावर गर्डर टाकण्याचे काम हाती




### कासारवडवली भागातील वाहतूक बदल

**प्रवेश बंद :** ठाणे घोडबंदर वाहिनीवर डोंगरीपाडा येथे स्टिल गर्डर चढवितांना घोडबंदर च्या दिशेने जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना पातलीपाडा उड्डाणपुल उतरणीच्या पुढे 'प्रवेश बंद' असेल. ही सर्व प्रकारची वाहने पातलीपाडा उड्डाणपूल उतणीच्या पुढे खुला केलेल्या मध्य दुभाजक कटमधून विरुद्ध दिशेने जाऊन वाघबिळ पुला पूर्वी ओपन केलेल्या कट मधून जाउन पुढे मुख्य रस्त्यामार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद :** ठाणे घोडबंदर वाहिनी वरून विरुद्ध दिशेने स्टिल गर्डरची वाहतुक करतांना पातलीपाडा पुला लगत स्लीप रोडने हिरानंदनी इस्टेटकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना पातलीपाडा ब्रिज चढणी जवळ 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :** ठाणे घोडबंदर वाहिनीवरून विरुद्ध दिशेने स्टिल गर्डरची वाहतूक करतांना हिरानंदनी इस्टेटकडे जाणाऱ्या सर्व वाहनांनी पातलीपाडा पुलावरून जाउन वाघबिळ पुला खालुन जातील.

**प्रवेश बंद :** ठाणे घोडबंदर वाहिनी वरून विरुद्ध दिशेने स्टिल गर्डरची वाहतुक करतांना मानपाडा पुळलगत स्लीप रोडने मानपाडा ब्रिज खाली तसेच टिकुजीनीवाडी कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना मानपाडा पूल चढणी जवळ 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. **पर्यायी मार्ग :** ठाणे घोडबंदर वाहिनी वरून विरुद्ध दिशेने स्टिल गर्डरची वाहतुक करतांना मानपाडा पुला खाली जाणाऱ्या सर्व वाहनांनी पातलीपाडा पुला खालुन तसेच टिकुजीनीवाडी कडे जाणाऱ्या सर्व वाहनांनी मुल्ला बाग मार्गे इच्छित स्थळी जातील. हे वाहतूक बदल शुक्रवारी रात्री ११. ५५ वाजता ते शनिवारी सकाळी ५ वाजेपर्यंत लागू असतील.

प्रवासी संघटनेने खा. नरेश म्हस्के यांचे मानले आभार

# गणेशोत्सवानिमित्त कोकण रेल्वेच्या तिकिटासाठी अतिरिक्त आरक्षण खिडक्या





◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांचा प्रवास सुखकर करण्याची ग्वाही खासदार नरेश म्हस्के दिली होती. त्यांच्या पाठपुराव्यामुळे गणेशोत्सवानिमित्त ठाणे रेल्वे स्थानकात कोकण रेल्वेच्या तिकिटासाठी दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या सुरु होणार आहेत. खिडक्यांची संख्या वाढल्याने गणेशभक्तांची वेळ आणि रांगेत उभे राहण्याची दमछाक कमी होणार आहे. अतिरिक्त खिडक्या वाढवल्याबद्दल खासदार नरेश म्हस्के यांचे कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने आभार मानले आहेत.

नोकरी आणि उद्योगधंद्यानिमित्त लोखो कोकणवासिय ठाणे, मुंबई आणि उपनगरांत स्थायिक झाले आहेत. कोकणी माणूस जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात असू द्या गणपतीला दरवर्षी तो गावी जातोच. गणपतीसाठी बहुसंख्य कोकणवासीय कोकण रेल्वेचा पर्याय निवडतात. मात्र आरक्षण खिडक्यांची नगण्य संख्या आणि लांब रांग यामुळे कोकणवासीय मेटाकुटीला येतात. ही बाब लक्षात घेऊन कोकण रेल्वे प्रवासी संघटनेने ठाणे रेल्वे स्थानकात आरक्षण तिकीट खिडक्या वाढवण्याची मागणी गेले ४ वर्ष लावून धरली होती. खासदार म्हणून निवडून आल्यानंतर संघटनेने ही मागणी नरेश म्हस्के यांच्याकडे करताच अवघ्या काही दिवसांतच हा प्रश्न मार्गी लागला आहे.

खासदार नरेश म्हस्के यांनी मध्य रेल्वेकडे ७ मे २०२५ रोजी या संदर्भात पत्रव्यवहार केला. या पत्राची तातडीने दखल घेत २ जून २०२५ रोजी मध्य रेल्वेचे अप्पर मंडल रेल प्रबंधक तरुण कुमार यांनी पत्राद्वारे २ अतिरिक्त आरक्षण तिकीट खिडक्या ठाणे रेल्वे स्थानकात सुरु करत असल्याची माहिती दिली आहे. २० जून २०२५ ते ५ जुलै २०२५ या दरम्यान या दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या सुरु राहणार आहेत. सध्या ४ आरक्षण खिडक्या कार्यरत असून २ अतिरिक्त खिडक्या सुरु होणार आहेत. ६ आरक्षण खिडक्यांमुळे आता कोकणवासियांची वेळ वाचणार असून रांगेत जास्त वेळ ताटकळत रहावे लागणार नसल्याने प्रवासी संघटनेने आनंद व्यक्त केला आहे.

# तानसा नदीकाठी राबविली स्वच्छता मोहीम



◆ **शहापूर (वार्ताहर) :**

वनशक्ती संस्था, वनविभाग अंबाडी, कुणबी समाज संस्था ठाणे पालघर जिल्हा, सुखभूमी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने व कृषी विभाग यांच्या सहकार्याने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून डाकिवली फाटा तानसा नदीकाठी व परिसरात भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत प्लास्टिक पिशव्या, थर्माकोल, फाटके कपडे, काच, बाटल्या यांसारख्या पर्यावरणावर घातक परिणाम करणाऱ्या वस्तू मोठ्या प्रमाणावर संकलित करुन सुमारे ४०० किलोहून अधिक कचरा उचलण्यात आला. तर या उपक्रमात चांबळे गावांमधील शाळेतील २५ पेक्षा जास्त विद्यार्थी व ४० पेक्षा अधिक स्वयंसेवक व ग्रामस्थांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता. तर यामध्ये नदीकाठचा कचरा उचलणे व नागरिकांना जनजागृतीपर संदेश देण्यात आले असल्याचे जयेश शेलार यांनी सांगितले.



मुरबाड नगरपंचायत हद्दीमध्ये मान्सून पूर्व तयारीच्या आनुषंगाने शहरातील मुख्य नाले व अंतर्गत नाले यांच्या साफसफाईचे कामे सुरू करण्यात आले. मुरबाड शहरात एकूण १७ प्रभाग मधील सर्व मुख्य नाल्यांची सफाई करून जेसीबीच्या सहाय्याने गटारील १५० टन गाळ काढण्यात आला. येणाऱ्या पावसाळ्यात मुरबाड शहरात नाले तुंबून पाणी भरले जाणार नाही याची दक्षता मुरबाड नगरपंचायत मुख्याधिकारी मनोज म्हसे यांच्याकडून घेण्यात आली आहे.

## वेचक

# केडीएमसी, रोटरी क्लबकडून क्षय रुग्णांना पोषण आहार वाटप

**कल्याण :** क्षय रुग्णांना उपचार कालावधीत पोषक आहार मिळाल्यास त्यांचा औषधोपचार व आहार यांमुळे आजार बरे होण्याचे प्रमाण वाढते. प्रधानमंत्री यांनी २०२५ पर्यंत २०१५ च्या तुलनेत क्षय रोगाचा प्रादुर्भाव



८० टक्के कमी करणे व क्षय रोगाच्या मृत्यूमध्ये २०१५ च्या तुलनेत ९० टक्के कमी करण्याचे ध्येय निश्चित केले आहे. हे ध्येय साध्य करण्यास औषधोपचारा सोबतच आहाराची महत्वाची भूमिका आहे. आचार्य अत्रे रंगमंदीर या ठिकाणी शुक्रवारी कल्याण, डोंबिवली महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभाग आणी रोटरी कल्ब ठाणे डिस्ट्रीक्ट क्रमांक ३१४२ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत अभियान अतंर्गत निक्षय मित्रा कडून क्षयरुग्णांना पोषण आहार वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रोटरी क्लब ठाणे डीस्ट्रीक्ट क्रमांक ३१४२ यांनी सहकार्य करुन महापालिका क्षेत्रातील उपचारा खालील १०० क्षयरुग्णांना पुढील ६ महिन्यासाठी दत्तक घेऊन निक्षय मित्र बनन्याचा बहुमान मिळवला. त्याचाच एक भाग म्हणुन या कार्यक्रमात क्षयरुग्णांना पोषण आहाराचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, डीस्ट्रीक्ट गर्व्हनर रोटरी क्लब दिनेश मेहता अवेन्यू चेअर, सचीन भोळे रोटरी क्लब, जगदिश चेलारमानी, डॉ. सोनल बांगडे, किर्ती वडलकर, अर्चना करमटकर, ललीत नेमाडे तसेच शहर क्षयरोग अधिकारी डॉ. पौर्णिमा ढाके व डॉ. सुहासिनी बडेकर, डॉ. प्रज्ञा टिके, डॉ. संदीप पगारे, डॉ. गणेश डोईफोडे, मंगेश खंदारे आणि राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमा अंतर्गत कार्यरत सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# मीरा-भाईंदर महापालिकेची नागरिक सेवा एका क्लिकवर

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदर महानगरपालिकेने नागरिकांच्या सेवेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत प्रशासन अधिक पारदर्शक, सुलभ आणि गतिमान करण्याच्या दिशेने पावले उचलत व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉट सेवेचे उद्घाटन केले या सुविधेमुळे नागरिक सेवा आता एका क्लिकवर मिळणार आहे. पत्रकार परिषदेत याबाबत माहिती देताना महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी सांगितले की, व्हॉटस्‌अ‍ॅप चॅटबॉट ही एक अत्याधुनिक संवाद प्रणाली असून नागरिकांनी फक्त क्रमांकावर संदेश पाठविला की, पुढे एक संवाद सुरू होतो आणि नागरिकांच्या गरजेनुसार विविध पर्याय त्यांच्या स्क्रीनवर उपलब्ध होतात. या प्रणालीचा उद्देश म्हणजे नागरिकांना शासकीय कार्यालयात न जाता त्वरित आणि अचूक सेवा मिळवून देणे आहे. मालमत्ता कर, पाणीपट्टी कर, आरटीएस सेवा, नागरिकांच्या तक्रारी नोंदवणे, आपत्ती व्यवस्थापनाची माहिती, पाणी टँकर नोंदणी, शासकीय रुग्णालयांची यादी, उद्यानांची माहिती इत्यादी सेवा उपलब्ध आहेत. यासाठी संबंधित विभागांना कार्यक्षम व तत्पर सेवा देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, या डिजिटल माध्यमाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी नागरिकांना केले आहे.

महापालिकेने अधिकृत संकेतस्थळ अद्ययावत केले आहे. या अद्ययावत संकेतस्थळावर माहिती अधिकार अधिनियमनुसार मागील पाच वर्षांची माहिती प्रकाशित करण्यात आली आहे. विविध विभागांमार्फत ठेकेदारांशी करण्यात आलेले कार्यादेश व करारनाम तसेच प्रभाग निहाय अनधिकृत बांधकामांची माहिती आता संकेतस्थळावर उपलब्ध झाली आहे. नवीन अद्ययावत संकेतस्थळात व्हॉइस ओव्हर प्रणालीचा समावेश करण्यात आला असून, हे संकेतस्थळ दृष्टिहीन आणि दिव्यांग नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

### डिजिटल उपक्रम व्हॉट्सअ‍ॅप चॅटबॉटचे उद्घाटन



# पर्यावरण दिनानिमित्त दिव्यांगांना निधी वाटप



◆ **शहापूर (वार्ताहर) :**

डोहोळे या ग्रामपंचायत वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्ष लागवड व प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करुन दिव्यांग लाभार्थ्यांना निधी वाटप करण्यात आले. ५ जून या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे वृक्षलागवड करुन येथे प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच डोहोळे, कोशिंबी, आन्हे, सोर व कळंबोली या गावातील सुमारे ५ टक्के दिव्यांगांना निधी वाटप करण्यात आले. तर ग्रामपंचायत हद्दीतील जवळपास ६० दिव्यांग लाभार्थ्यांपैकी ३३ लाभार्थ्यांना निधी वाटप करण्यात आले.

# धोकादायक इमारतीतील दुकानावर धडक कारवाई !

◆ **ठाणे (वार्ताहर) :**

कळवा परिसरातील खारीगांव नाका येथे नाणिक निवास या इमारतील वाईन शॉप, बियर शॉप व अन्य एका दुकानावर आज कळवा प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त ललिता जाधव यांच्या आदेशाने धडक कारवाई करण्यात आली. नाणिक निवास ही इमारती ३० ते ३५ वर्षे जुनी असून ती अति धोकादायक झाली होती. महापालिकेने गेल्या सहा महिन्यांपासून या इमारतीतील रहिवाश्यांना नोटीस देऊन घर खाली करण्याच्या सूचना दिल्या होत्या त्यानुसार रहिवाश्यांनी घरे खाली केली होती मात्र या इमारतीत असणारे दारूचे दुकानदार व बियर शॉपवाले महापालिकेच्या नोटीसला वाटण्याच्या अक्षदा लावत होते. तीनदा नोटीस देऊन ही दुकाने खाली करत नव्हते या संदर्भात कळवा प्रभाग समितीच्या अतिक्रमण विभागाकडे येथील नागरिकांच्या अनेक तक्रारी आल्या होत्या त्यानुसार शुक्रवारी कळवा प्रभाग समितीच्या वतीने धडक कारवाई करून ही दुकाने जमिनोदोस्त करण्यात आली यावेळी अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व पोलिस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात ठेवण्यात आला होता.




छाया : अशोक घाग

# कल्याण परिमंडलात महावितरणचा विद्युत सुरक्षा सप्ताह

### ४ हजार १८१ कर्मचाऱ्यांनी घेतली वीज सुरक्षेची शपथ

◆ **कल्याण (वार्ताहर) :**

महावितरणच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन राज्यभरात १ ते ६ जून दरम्यान वीज सुरक्षा सप्ताह साजरा होत आहे. सप्ताहाच्या शेवटच्या दिवशी शुक्रवारी (६ जून) कल्याण परिमंडल, चार मंडल कार्यालये, दहा विभाग कार्यालये तसेच ४० उपविभागीय व १८१ शाखा कार्यालयांमध्ये ४ हजार १८१ नियमित व बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी वीज सुरक्षेची शपथ घेतली. यात २ हजार ६४२ नियमित कर्मचारी तर १ हजार ५३९ कंत्राटी कामगारांचा समावेश आहे. मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनाखाली कल्याण परिमंडलात सुरक्षा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा होत आहे.

या सप्ताहात अधिकारी-कर्मचाऱ्यांमार्फत मॅरेथॉन, रॅली, चित्रकला व निबंध स्पर्धा, रहिवाशी सोसायट्यांना भेटी अशा विविध माध्यमातून वीज सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली. शुक्रवारी सकाळी परिमंडल कार्यालयाच्या आवारात मुख्य अभियंता श्री. मिश्रा यांच्या उपस्थितीत वीज सुरक्षेची शपथ घेण्याचा मुख्य कार्यक्रम झाला. यावेळी कल्याण मंडल एकचे अधीक्षक अभियंता अनिल थोरात, कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता विजय फुंदे, स्थापत्य विभागाचे अधीक्षक अभियंता मोहन काळोगे, पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता महेश अंचिनमाने, चाचणी विभागाचे अधीक्षक अभियंता मंदार अत्रे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी अजित इगतपुरीकर यांच्यासह अभियंते, अधिकारी, नियमित कर्मचारी व कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधीक्षक अभियंता दिलीप खानंदे यांच्या उपस्थितीत पालघर व अधीक्षक अभियंता संजय खंडारे यांच्या उपस्थितीत वसई मंडल कार्यालयात वीज सुरक्षेची शपथ घेण्यात आली.



## किसळ – पारगावमध्ये २०,००० झाडांची लागवड!

# पर्यावरण दिनानिमित्त 'हरित समृद्ध गाव' उपक्रमाला सुरुवात

◆ **मुरबाड (वार्ताहर) :**

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने दि. ५जून २०२५ रोजी किसळ - पारगाव ग्रामपंचायतीत एक ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले. २००० झाडांची सामूहिक लागवडीद्वारे हरित समृद्ध गाव या दीर्घकालीन संकल्पनेचा प्रारंभ करण्यात आला. इंप्का, ग्रामपंचायत किसळ-पारगाव आणि आरएससीडी (रिसोर्स अँड सपोर्ट सेंटर फॉर डेवलपमेंट) या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.



सागवान वृक्ष लागवड करून या आले.

ग्रामपंचायत ग्रामसेविका, ग्रामपंचायत सदस्य, पेसा मोबिलायझर, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, शेतकरी वर्ग, जैवविविधता समिती सदस्य व प्रतिनिधी आणि गावातील स्त्री शक्ती उत्स्फूर्तपणे सहभागी झाली होती. एकूण ५० हून अधिक शेतकरी आणि ग्रामस्थांनी या उपक्रमाला सक्रिय पाठिंबा दिला.

या मोहिमेचा उद्देश केवळ झाडे लावणे नसून, ग्रामविकासात पर्यावरणपूरक दृष्टीकोन रुजवणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी नैसर्गिक संपत्ती जपणे हा आहे. पर्यावरण पूरक अशी उपयुक्त झाडांची निवड करून लागवड केली जाणार आहे.

संपूर्ण जून महिन्यात गावात विशेष सागवान लागवड मोहीम राबवण्यात येणार आहे. यामध्ये शोधिनी गट, ग्राम जैवविविधता समिती, शेतकरीवर्ग, तरुण वर्ग व महिला बचत गट सहभागी होणार आहेत. या उपक्रमामुळे किसळ - पारगाव केवळ नकाशावर हिरवे होणार नाही, तर पर्यावरणीय, सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनातूनही आदर्श गाव म्हणून पुढे येईल, असा विश्वास

# 'शिवरायांनी स्वराज्य नव्हे, तर साम्राज्य उभे केले'

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

युद्ध म्हणजे शक्ती आणि युक्तीचा अनोखा संगम. शत्रूची बलस्थाने टाळून छोट्या छोट्या टोळ्यांच्या माध्यमातून गनिमी कावा जगाला शिकवला तो छत्रपती शिवाजी महाराजांनी. दुसऱ्या महायुद्धात शिवरायांची युद्धनीती अवलंबवली गेली. आयसन ऑव्हर महाराजांना गुरुस्थनी मानतो. पेहलगाम हल्ल्याचा बदला ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून राबवताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शिवनीतीचा अवलंब केला.

शिवरायांनी हिंदवी स्वराज्यच नव्हे तर साम्राज्य उभे करताना ज्या यूद्धनीतीचा अवलंब केला सामोरे जाताना आदर्श मानली जाते, असे प्रेरणादायी मनोगत शिवअभ्यासक व पाणीवालेबाबा आनंद भागवत यांनी व्यक्त केले. संस्कृती परिवार सामाजिक संस्था, ठाणे यांच्या विद्यमाने श्री आनंद भरती समाज सभागृहात छत्रपती शिवराज्याभिषेकाचा त्रिशतकोत्तर ५१ वा सोहळा शुक्रवारी थाटात संपन्न झाला. प्रारंभी प्रमूख वक्ते संस्कृती परिवाराचे अध्यक्ष विनोद धागे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी अध्यक्षा सुधाताई ढगे व्यासपीठावर उपस्थित होत्या. यावेळी गणपती पुजन, पुण्याह वाचन, मातृका पुजन, महादेव पुजन, पुष्पाताई लेले संचलित स्वरसंवादिनी भजन मंडळाचे शिवगायन आणि शेवटी शिवप्रतिमेची सवाद्य पालखी मिरवणूकीने श्री शिवराज्याभिषेक



# चिनाब रेल्वे पूल, विकासाचे नवे पर्व

भारताचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीरला आता थेट रेल्वेने जाता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जम्मू-काश्मीरमधील लाखो रहिवाशांचे स्वप्न पूर्ण केले. चिनाब नदीवर जगातील सर्वात इंच रेल्वे पूल उभारला आहे, त्याचे उद्घाटन पंतप्रधानांनी केले आणि भारतातील पहिला केबल स्टेड ब्रीज असलेल्या अंजी पुलाचेही त्यांनी उद्घाटन केले. जम्मू आणि पीर पंजलमधील उंच टेकड्या ओलांडल्यानंतर रियासी जिल्ह्यात चिनाब नदीवर ३५९ मीटर उंच आणि १३१५ मीटर लांबीचा रेल्वे पूल उभारण्यात आला आहे. चिनाब रेल्वे पुलाच्या निमित्ताने पंतप्रधानांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी, केंद्रीय विज्ञान तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग, नायब राज्यपाल मनोज सिन्हा, मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या उपस्थितीत काश्मीरला तब्बल ४४ हजार कोटींच्या विकास प्रकल्पांची भेट दिली. गेली अनेक वर्षे काश्मीर खोरे दहशतवादाच्या विळख्यात आहे.

गेल्या अकरा वर्षांत नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार आल्यापासून दहशतवादाविरोधात सरकारने कठोर पावले उचलली. दहशतवादाचा खात्मा करण्यासाठी पोलिसांना, सुरक्षा दलाला आणि निमलष्करी दलाला पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे. पुलवामा, उरी, पहलगाम अशा काही ठिकाणी दहशतवाद्यांनी हिंसाचार घडवला, रक्तपात केला पण भारताच्या सुरक्षा दलाने तेवढ्याच सडेतोडपणे त्याचा समाचार घेतला. पहलगाम हत्याकांडानंतर भारताने पाकिस्तानवर हवाई व क्षेपणास्त्रांचे हल्ले करून दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. शंभर दहशतवादी यमसदनाला पाठवले. पाकिस्तानधील प्रमुख हवाई तळांचे प्रचंड नुकसान झाले. जम्मू-काश्मीरमध्ये शांतता नांदली पाहिजे आणि काश्मिरी जनतेच्या उन्नतीसाठी विकासाच्या योजना राबवल्या पाहिजेत अशा दोन्ही आघाड्यांवर मोदी सरकार गेली अकरा वर्षे काम करीत आहे. चिनाब नदीवर उभारलेल्या रेल्वे पुलामुळे काश्मीरचा कायापालट होईल असा विश्वास पंतप्रधानांनी काश्मिरी जनतेला दिला आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला उपस्थित होते. काश्मीर खोरे हे रेल्वेने देशाशी जोडले जावे अशी त्यांची मनापासून इच्छा होती, एवढेच नव्हे तर त्यांच्या लहापणापासून म्हणजेच ते सातवी-आठवीत असल्यापासून काश्मीर खोऱ्यात रेल्वे धावली पाहिजे, हे त्यांचे स्वप्न होते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ओमर अब्दुल्ला यांचे बालपणीपासूनचे स्वप्न उद्घाटनाच्या कार्यक्रमात जाहीरपणे बोलून दाखवले.

कटरा ते श्रीनगर या मार्गावर आता वंदे भारत ट्रेन धावू लागली आहे. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला हे रेल्वेमार्गाचे स्वप्न तर पूर्ण होणारच आहे पण श्रीनगरवरून थेट नवी दिल्लीला येत्या ऑगस्ट-सप्टेंबरपासून थेट रेल्वे धावू लागेल. काश्मीर खोरे हे देशाच्या राजधानीशी रेल्वेने थेट जोडले जाणार आहे, त्याचबरोबर देशातील सर्व महत्त्वाच्या शहरांशी काश्मीर खोरे रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे ही भारताची प्रथमपासून भूमिका आहे. काश्मीरला देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठीच मोदी सरकारने घटनेतील ३७० व्या कलमाचे सुरक्षा कवच काढून घेतले. मोदी सरकारच्या या निर्णयाला काश्मीरमधील व देशातील कट्टरतावादी संघटनांनी व नेत्यांनी जरूर विरोध केला पण गेल्या अकरा वर्षांत काश्मीरमध्ये मोदी सरकारने विकास प्रकल्पांचा जो धडाका लावला आहे, त्यात चिनाब नदीवर उभारलेला जगातील सर्वात उंच पूल हा शिरपेचातील तुरा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे हातात तिरंगा फडकवत चिनाब रेल्वेच्या पुलावरून चालत गेले तो क्षण देशाला अभिमान वाटणारा होता. आम्ही सारे एक आहोत ही भावना दृढ निर्माण करणारा होता. काश्मीरमध्ये धावणाऱ्या पहिल्या वंदे भारत ट्रेनला पंतप्रधान मोदींनी हिरवा झेंडा दाखवला तेव्हाही ते दृश्य टीव्हीच्या पडद्यावर बघणाऱ्या कोट्यवधी लोकांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. फ्रान्समधील आयफेल टॉवर बघायला जगभरातून पर्यटक जात असतात, दुबईतील बुर्ज खलिफा बघायला रोज हजारो लोकांची गर्दी असते तसेच काश्मीरमधील चिनाब रेल्वे पुलावरून रेल्वे प्रवासाचा आनंद लुटण्यासाठी देशातूनच नव्हे तर जगभरातून लाखो पर्यटक येतील व काश्मीरचे खोरे पुन्हा पर्यटकांच्या गर्दीने फुलून जाईल. कटरा ते श्रीनगर या रस्ते प्रवासाला साधारणतः दहा तास लागतात. आता रेल्वेने केवळ तीन तासांत श्रीनगरला पोहोचता येईल. वाटेत केवळ बनिहाल येथे वंदे भारत थांबणार आहे. नंतर मागणीनुसार अन्य थांबे ठरविण्यात येणार आहेत. गेल्या वर्षभरात भारतीय पर्यटकांची संख्या काश्मीर खोऱ्यात लक्षणीय वाढली होती. पहलगाम येथे झालेल्या हत्याकांडानंतर पर्यटकांच्या संख्येला एकदम ब्रेक लागला. आता पुन्हा काश्मीरकडे पर्यटक येऊ लागतील व भारताचे नंदनवन पुन्हा पर्यटकांनी बहरून जाईल. काश्मीरच्या निसर्गरम्य परिसरात चित्रपटांचे चित्रीकरण पुन्हा सुरू होईल आणि मैदानेही खेळाडूंनी गजबजलेली दिसतील. वेगवेगळ्या फुला-फळांनी बहरलेले बगीचे पर्यटकांना आकर्षित करतील. श्रीनगरपर्यंत थेट रेल्वे सुरू झाली आहेच पण वंदे भारत ट्रेनचा प्रवास हे आणखी आकर्षण आहे.

काश्मीर खोऱ्यात सध्या सर्वत्र इदचे वातावरण आहे. शिवाय अमरनाथ यात्रेचे वेध हिंदू भाविकांना लागले आहेत. नव्या रेल्वे मार्गामुळे श्रीनगरकडे जाताना कोणतीही अडचण राहिलेली नाही. बर्फ वृष्टी झाल्यावर जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग अनेकदा बंद होतो. कधी कधी आठ ते पंधरा दिवस रस्ते वाहतून ठप्प राहते. आता ट्रेनमुळे प्रवासी, पर्यटक, व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक यांना श्रीनगर गाठणे सोपे झाले आहे. ट्रेनचे तिकीटही वाजवी आहे. सफरचंद, चेरीसारखी फळे रेल्वेने दिल्ली व अन्य शहरांकडे पाठवणे आता सोयीचे झाले आहे. रेल्वे मार्गामुळे व्यापार व निर्यात यात विलक्षण वाढ होऊ शकते व त्यातूनच काश्मीरची समृद्धीकडे वाटचाल होऊ शकते.

# आधुनिक सावित्रीची अवहेलना, जबाबदार कोण ?



एकीकडे आज महिला सर्व क्षेत्रांमध्ये सर्वोत्तम उंची गाठत, आपले कुटुंब, छंद अणि व्यवसाय यांची सांगड घालत आयुष्याला नवीन दिशा देत आहेत. मुलगा आणि मुलगी हा लिंगभेद आता जवळपास नष्ट झालेला आहे. बऱ्याच ठिकाणी मुलींना आपल्या घरातील लक्ष्मीचे स्थान देत आनंदाने मुलीचा जन्म साजरा केला जातो. असे कोणतेच काम किंवा क्षेत्र नाही जिथे महिला नाहीत.

पण तरी देखील आज समाजात महिलांना बघण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला की नाही यावर शंका उपस्थित झाली आहे. वैष्णवी हगवणेची संपूर्ण घटना अभ्यासली तर खरंच खूप विविध अंगी प्रश्न पडतात की अजूनही मुली, कुटुंब, आपला समाज बुरसटलेल्या विचारांनी ग्रस्त आहे. आज वैष्णवीची घटना मीडियामुळे जगासमोर आली; परंतु गावोगावी, खेड्यापाड्यात अनेक उच्चभ्रू घरांमध्ये अशा कितीतरी वैष्णवी असतील ज्या जगासमोर येत नसतील. जर आजच्या एकविसाव्या शतकातील आधुनिक, सुशिक्षित अणि स्वतंत्र विचारांच्या मुलींचा आपल्या पसंतीचा मुलगा शोधून, आई-वडिलांच्या संमतीने लग्न करून देखील हुंडाबळीसारख्या प्रथेला सामोरे जाऊन त्यांचा जीव जात असेल तर खरोखरच विचार करावा लागेल की खरंच महिलांच्या बाबतीत समाज आणि कुटुंबाची विचारसरणी बदलली आहे का?

आज मुलगी स्वतः शिकली आहे, कमावती आहे, स्वतःच्या पायावर उभी आहे. तिची स्वतःची स्वप्नं देखील ती पूर्ण करत आहे. असे असताना केवळ भौतिक वस्तूंसाठी आणि पैशासाठी तिचा एवढा अमानुषपणे सासरच्या मंडळींनी छळ करावा इतकी हतबल आजची मुलगी असू शकते यावर विश्वास बसत नाही; परंतु वैष्णवीची घटना आपल्याला आज देखील मुलींवर होणाऱ्या घरगुती हिंसेचा बळी जातोय हे सत्य स्वीकारायला भाग पाडते.

**नक्की या घटनेसाठी जबाबदार कोणाला समजायचे?**

ज्या सासरच्या लोकांनी ज्यात तिची नणंद आणि सासू दोघी महिला आहेत अणि तरी त्यांनी तिच्यावर छळ केला, तिच्यावर इतक्या जखमा करून तिचा जीव घेतला त्यांना की तिच्या आई-वडिलांना ज्यांना मुलीची सगळी स्थिती माहीत असून देखील त्यांनी आपल्या मुलीला खंबीरपणे साथ न देता 'जा मुली दिल्या घरी सुखी राहा' म्हणत तिच्या लालची सासरच्या मंडळींचे लाड पुरवत होते, मुलीचा संसार तुटू नये म्हणून चुकीच्या गोष्टींना दुजोरा देत होते त्यांना. मुलीच्या जीवापेक्षा संसार महत्त्वाचा असतो का हा प्रश्न येथे निर्माण होतो. केवळ आपल्या मुलीचा संसार वाचावा अणि समाजात अब्रू जाऊ नये म्हणून मुलीला हाल अणि त्रास भोगत तिथेच राहा म्हणणारे पालक अजून देखील आहेत.

याचा अर्थ मग समाजाला आपण दोषी ठरवायचे का कारण तिच्या आई-वडिलांनी समाजाचा विचार केला की वैष्णवीने जर नवऱ्याचे घर अणि सासरची मंडळी सोडली आणि ती आई-वडिलांकडे राहू लागली, तर समाज काय म्हणेल या भीतीपोटी तिला तिथून बाहेर पडायला साथ देत नव्हते. आपला समाज हा इतका मागासलेल्या विचारांचा आहे की एखाद्या मुलीला त्रास होत असेल तरीही तिने नवऱ्याच्या घरी राहावे आणि मुलीच्या आई-वडिलांनी देखील आपली मुलगी सासरचे घर सोडून आली तर समाज काय म्हणेल या भीतीने ते त्यांच्या मागण्या पुरवत मुलीला त्या नरकामध्ये यातना सोसायला सोडत ठेवावे.

म्हणजे आपला समाज आज २१ व्या शतकात देखील हाच विचार करतोय की मुलीने मानसिक आणि शारीरिक त्रास होत असेल तरी सासरी राहावे अणि त्रास सहन करावा आणि मुलगी एकदा लग्न करून गेली की तेच तिचे घर असते. मग मुलींना स्वातंत्र्य देऊन, मुलींनी सुशिक्षित होऊन, स्वतःच्या पायावर उभे राहून नक्की बदल काय झाला? खरोखर वैष्णवीच्या घटनेने आपली विचार करण्याची पद्धती समाजाने बदलण्याची गरज आहे हे दाखवून दिले आहे.

आज त्याच घरातली आणखी एक सून जिला आई-वडील अणि भावाने समजून घेतलं, तिला सपोर्ट केला, तिच्या पाठीशी खंबीर उभे राहिले आणि पोलिसांमध्ये तक्रार केली. आज वैष्णवीची मोठी जाऊ या छळाला बळी न पडता स्वतःसाठी लढली आणि समाजाचा विचार न करता कुटुंबाने साथ दिल्यामुळे ती यातून वाचली आणि आपल्यात जिवंत आहे. स्वतःचं पोट भरत आपले जीवन सुधारू शकते इतपत ती गंभीरपणे जगाला आणि समाजाला सामोरे जाऊ शकते हे तिने सिद्ध केले; परंतु त्याच घरातली दुसरी सून वैष्णवी जी स्वतः तिथून सुटका करण्यात असमर्थ ठरली आणि जिच्या आई-वडिलांनी तिला समजून न घेता तिच्या सासरच्या मंडळींचे लाड पुरवले. तिला स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा आत्मविश्वास न देता त्यांच्या मागण्या केवळ मुलीचा संसार तुटू नये म्हणून पूर्ण करत राहिले आणि शेवटी मुलीचा जीव गेला.



**आरती बनसोडे**
मानसिक समुपदेशक, मुंबई

या एकाच घरातल्या दोन घटना दोन कुटुंबांच्या आणि आपल्या समाजाच्या दोन पैलू दर्शवत आहेत. पण मला असं वाटतं या सगळ्या घटनेला जास्त जबाबदार कोण असेल तर ती म्हणजे मुलगी स्वतः कारण की जर आपण शिक्षण घेतो, स्वतःच्या पायावर उभे राहतो तर आपल्यावर अन्याय होत आहे ही गोष्ट समजताच वैष्णवीने स्वतःसाठी खंबीरपणे उभं राहायला हवं होतं. आई-वडिलांकडे पैसे न मागता सासरच्या मंडळींना नकार देऊन आई-वडिलांना जसे लग्न करून द्या म्हणून समजूत घालून तयार केले त्याचप्रमाणे माझा निर्णय चुकला म्हणून माफी मागत आई-वडिलांची मदत घेत नवरा आणि सासरच्या मंडळींना मोठ्या जावेप्रमाणे धडा शिकवायला हवा होता.

आज सुद्धा एकविसाव्या शतकात जिथे मुली काहीही करू शकतात हे सिद्ध झाले असताना मुलींना हुंडाबळीमुळे जीव गमवावा लागत आहे हे मन मानायला तयार नाही. या हुंड्यामुळे आणि घरगुती हिंसाचाराने कित्येक मुलींचे आणि त्यांच्या आई-बाबांचे आयुष्य उद्ध्वस्त होते. अशा वातावरणामुळे मुलींच्या मानसिक स्वास्थ्यावर तसेच शारीरिक स्वास्थ्यावर देखील परिणाम होतो. शिवाय मुलींच्या घरच्यांना देखील त्रास सहन करावा लागतो. मुलींना शिक्षण देताना स्वरक्षणाचे धडे देखील समाविष्ट केले पाहिजेत. तिची मानसिकता सक्षम करून तिला स्वतःच्या पायावर उभे राहणे, लघु उद्योग करून घरच्या घरी कमाई करून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याची मानसिकता विकसित करणे फार आवश्यक आहे म्हणजे अशा वैष्णवी बनणार नाहीत. आजच्या एकविसाव्या शतकात मुली किंवा स्त्रिया या स्वतंत्र विचारांच्या जरी असल्या तरी त्यांनी अति भावनाशील न राहता थोडा प्रॅक्टिकल विचार करत वागण्याचे धडे त्यांना घरातून दिले पाहिजेत.

लग्नापूर्वी मुलींनी स्वतः स्वतःच्या मेहनतीने आणि स्वतःच्या पैशाने कमीतकमी चाळीमध्ये एक रूम किचन घर घेऊन मग लग्न करा म्हणजे लग्नानंतर जर दुर्दैवाने अशी स्थिती उद्भवली तर सासरी किंवा माहेरी अवलंबून न राहता त्या त्यांच्या साध्या पण स्वतःच्या हक्काच्या घरात राहू शकतात. वैष्णवीच्या घटनेने हे दाखवून दिले की आई-वडिलांनी धुमधडाक्यात लग्न लावून पैसे वाया घालवण्यापेक्षा मुलीच्या नावाने बँकेत फिक्स डिपॉझिट करा जी तिला वेळ प्रसंगी उपयोगात येईल.

स्त्रिया या सर्व कुटुंबाची जबाबदारी स्वीकारून नोकरी करतात त्यामुळे त्यांना ओझे न समजता घरच्यांनी सुद्धा पाठिंबा देत त्यांना समजून घेऊन त्यांची मदत केली पाहिजे तरच असे हुंडाबळी आणि कौटुंबिक हिंसाचार बंद होतील.

**bbansodeaarti@gmail.com**

# कोकण रेल्वे स्थानकांवरील छताचे काम पूर्ण करा



कोकणातील रेल्वे सेवा सध्या जनतेची जीवनवाहिनी झाली आहे. कोकणात रेल्वे सुरू होऊन या वर्षी २७ वर्षे पूर्ण झाली. देशातील मुंबई व मंगळूरु या बंदरांना जोडणारा कोकण रेल्वे हा महत्त्वाचा मार्ग आहे. हल्लीकडे कोकणातील रेल्वे स्थानकांच्या दर्शनी भागांचे आणि प्रवेशद्वारांचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. ही कोकण रेल्वेच्या दृष्टीने समाधानाची बाब असली तरी रेल्वे प्लॅटफॉर्मवर प्रवाशांना आसरा मिळण्यासाठी अजूनही छत अपुरे आहेत. या मार्गावरून जवळजवळ ३० प्रमुख रेल्वेगाड्या धावत आहेत. तेव्हा रेल्वे प्रवाशांच्या दृष्टीने रेल्वे स्थानकांवरील प्लॅटफॉर्मवर पूर्ण छत बांधण्यासाठी रेल्वे प्रशासनाला जागृत करण्यासाठी थोडक्यात घेतलेला वेध.

कोकण रेल्वेमार्गावरील मंगळूरु ते उडुपी दरम्यान पहिली रेल्वे २० मार्च १९९३ रोजी धावली होती. त्याआधी १५ सप्टेंबर १९९० रोजी रोहा येथे कोकण रेल्वेचा पायाभरणी समारंभ करण्यात आला. त्यानंतर अवघड असा वाटणारा कोकण रेल्वे मार्गाचे २६ जानेवारी १९९८ रोजी उद्घाटन होऊन रेल्वेसेवा सुरु करण्यात आली. याचे खरे श्रेय कोकणातील राजापूर लोकसभा मतदारसंघातून (आताचे रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघ) सलग पाच वेळा लोकसभा सदस्य म्हणून निवडून आलेले मधू दंडवते यांना जाते. त्यामुळे त्यांना कोकण रेल्वेचे शिल्पकार असे अभिमानाने लोक म्हणतात. यासाठी जवळ जवळ सत्तेचाळीस हजार कोकणातील कुटुंबीयांना विस्थापित व्हावे लागले होते. आता या मार्गावरून रेल्वे सुरु होऊन २७ वर्षे पूर्ण झाली असून रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्मवरील अपुऱ्या छतामुळे प्रवाशांचे खूप हाल होत आहेत. त्यात बसण्याची सुद्धा सोय नाही. मग सांगा वृद्ध व्यक्ती, अपंग व्यक्ती किंवा लहान मुले यांचे होणार कसे? त्यात यावर्षी मे महिन्यापासून पावसाला सुरुवात झाला आहे.



**रवींद्र तांबे**

मी जेव्हा २३ मे रोजी मुंबईला येत होतो त्या दिवशी पाऊस होता. त्यामुळे छत्री असून सुद्धा माझ्याजवळ सामान असल्याने भिजत रेल्वे डब्यापर्यंत जावे लागले. बऱ्याच वेळा या मार्गावरील रेल्वे गाड्या उशिराने धावत असतात. अशावेळी छत असेल तर प्रवाशांचे हाल होणार नाहीत. प्रवासी थोडी विश्रांती घेऊ शकतात. लोक आपापल्या डब्याकडे जाऊन गाडीची वाट पाहू शकतात. त्यामुळे प्लॅटफॉर्मवर गर्दी सुद्धा होणार नाही.

अपुरे छत असल्यामुळे रेल्वे प्रवाशांचे खूप हाल होतात. तसेच गाडी आल्यावर प्रवाशांची धावाधाव होते. काही वेळा एकमेकांना आपटतात सुद्धा. बऱ्याच वेळा गाडी सुटेल म्हणून समोर असलेल्या डब्यात लोक चडतात. नंतर शोधत शोधत आपल्या डब्याकडे जातात. त्यावेळी त्या आसनावर वेगळीच व्यक्ती झोपलेली असते. त्याला उठवायला अर्धा तास जातो. त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो. इतकेच नव्हे तर १८ मे रोजी मुंबईला जाणारी दुपारी ३.०० ची रेल्वे गाडी रात्री १०.०० वाजता येण्याचे संकेत रेल्वेन प्रशासनाने दिले असताना सुद्धा ती रेल्वे गाडी रात्री १२.०० वाजता आली. तेव्हा जवळच्या प्रवाशांचे सोडा लांबच्या प्रवाशांचे काय हाल झाले असतील त्याची कल्पना न केलेली बरी. त्यात मुसळधार पाऊस. काही प्रवासी एका बाजूला आपले सामान ठेवून रेल्वे प्रशासनास मालवणीत समाचार घेत होते. अशावेळी प्लॅटफॉर्मवर छत असते तर प्रवाशांची हालत झाली नसती. अजूनही एकच रेल्वे मार्ग असल्याने क्रॉसिंग करताना सुद्धा वेळ जातो. याचा परिणाम लांब पल्ल्याच्या गाड्या उशिराने धावतात. तेव्हा उन्हाळा, पावसाळा व हिवाळा असो रेल्वे स्टेशनवर गाडीच्या लांबीचे पूर्ण छत असले पाहिजे. शेवटी प्रवाशांचे सुख हेच रेल्वे प्रशासनाचे सुख असते. आपल्या भारतीय रेल्वेचे ब्रीदवाक्य "देशाची जीवनवाहिनी" असे आहे. जर आपण सर्वांनी भारतीय रेल्वेच्या ब्रीदवाक्याचा विचार केल्यास जी देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी आणि प्रवाशांच्या सेवेसाठी खूप महत्त्वाची आहे. महत्त्वाची बाब म्हणजे कोकण रेल्वे देशाच्या उत्पनाचे एक प्रभावी साधन मानले जाते. मागील दिवाळीला रेल्वेने ७७ दिवसांचा बोनस आपल्या सेवकांना जाहीर केला होता. यावरून तिचा कारभार किती जोरात चालला आहे याची कल्पना येते. कोकण विभागातील सुमारे ३६ रेल्वे स्थानकांच्या दर्शनी भागांचे आणि प्रवेशद्वारांचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. याची सर्व जबाबदारी राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतली आहे. काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे नवीन बसवलेल्या छताला आणि क्लॅडिंगचे नुकसान झाले आहे. तसेच अनेक स्थानकांचे काम अपुरे आहे. पावसाचे पाणी आतमध्ये ठिबकत आहे. असे जरी असले तरी प्रथम प्रवाशांच्या सेवेसाठी रेल्वे आहे हे ओळखून सुशोभीकरणाबरोबर प्लॅटफॉर्मवरील छताचे काम पूर्ण झाले पाहिजे.

आतापर्यंत २७ वर्षे कोकण रेल्वेला पूर्ण झाली. त्यात एक वर्ष गेले तर काय फरक पडणार आहे. तेव्हा कोकण रेल्वे मार्गावरील सर्व रेल्वे स्थानकावर पूर्ण छत होणे प्रवाशांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. जर आपण कोकणातील रेल्वे स्थानकांच्या गरजांचा विचार करता प्रथम रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्मवर छत झाले पाहिजे. म्हणजे रेल्वे प्रवाशांचा मानसिक ताण कमी होईल. त्यामुळे रेल्वे प्लॅटफॉर्मवर रेल्वे गाडी आल्या आल्यास प्रवाशांना पळापळ करण्याची वेळ येणार नाही. तेव्हा रेल्वे प्रवाशांच्या हिताच्या दृष्टीने कोकण रेल्वे प्रशासनाने रेल्वे सुशोभीकरणाबरोबर रेल्वे प्लॅटफॉर्मवरील छत तातडीने बांधणे प्रवासी तसेच रेल्वे प्रशासनाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

## राशिभविष्य
शनिवार, ७ जून २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती ज्येष्ठ शुद्ध द्वादशी शके १९४७., चंद्र नक्षत्र चित्रा ०९.४० पर्यंत नंतर स्वाती, योग वरियान, चंद्र राशी तूळ शनिवार, दिनांक ७ जून २०२५. सूर्योदय ०६.०० सूर्यास्त ०७.१४ चंद्रोदय ०३.५८ चंद्रास्त ०३.२९ राहू काळ ०९.१८ ते १०.५७, भागवत एकादशी, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती-तिथी प्रमाणे, बकरी ईद.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : इच्छित गोष्टी साध्य करता येतील.

**वृषभ** : अपेक्षित गोष्टी साध्य करता येतील.

**मिथुन** : आत्मविश्वासाने वागणे आवश्यक आहे.

**कर्क** : सावध राहणे आवश्यक आहे.

**सिंह** : नोकरदारांना दिलासा मिळेल.

**कन्या** : नियमांचे कटाक्षाने पालन करा.

**तूळ** : जोडीदाराची उत्तम साथ मिळेल.

**वृश्चिक** : नोकरदारांनी आपल्या कामामध्ये सातत्य ठेवावे.

**धनू** : विद्यार्थी वर्गाला उत्तम दिवस.

**मकर** : कुटुंबातील गोष्टींना प्राधान्य द्यावयास पाहिजे.

**कुंभ** : आप्तेष्ट मित्रमंडळींच्या गाठीभेटी होतील.

**मीन** : आर्थिक कुचंबणा दूर होईल.

### चेंगराचेंगरी : लोकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक

१८ वर्षांनंतर प्रथमच आयपीएल विजेतेपद मिळवलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु अर्थात आरसीबी या संघाचे स्वागत करण्यासाठी एकाच वेळी लाखो लोक बंगळूरुच्या रस्त्यावर उतरले आणि जे घडू नये ते घडले. बंगळूरुच्या एम. चिन्नास्वामी मैदानाबाहेर चेंगराचेंगरीची घटना घडली. या घटनेत ११ लोकांचा दुर्दैवी मृत्यू झाला तर ३५ लोक जखमी झाले. खरे तर चेंगराचेंगरी होऊन अनेक लोक मृत्युमुखी पडण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. अशा प्रकारच्या दुर्दैवी घटना देशात अनेक वेळा घडल्या आहेत. अगदी अलीकडच्या काही घटना म्हणजे, मे महिन्यात उत्तर गोव्यातील शिरगाव येथील लैराई देवीच्या यात्रेत झालेल्या चेंगराचेंगरीत सात भाविकांचा मृत्यू झाला. फेब्रुवारी महिन्यात नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या चेंगराचेंगरीत १८ लोक मृत्यू पावले. २९ जानेवारी २०२५ रोजी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ मेळ्यात चेंगराचेंगरी होऊन ३० जण प्राणास मुकले. २ जुलै २०२४ रोजी उत्तर प्रदेशमधील हाथरसमध्ये एका सत्संग कार्यक्रमात चेंगराचेंगरी झाल्याने १०७ लोकांचा मृत्यू झाला. गर्दीच्या ठिकाणच्या प्रशासनाच्या गैरव्यवस्थापनामुळे चेंगराचेंगरी होऊन माणसे नाहक मृत्यूला सामोरे जातात. भविष्यात अशा दुःखद घटना घडू नयेत यासाठी गर्दीचे योग्य नियोजन करणे आणि लोकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे.

– **प्रदीप अनुसया शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व)

### सावित्री नको तोडू फांद्या...




एक प्रचंड महाकाय वटवृक्ष काय देतो आपल्याला सावली आणि थंडावा, जमिनीची धूप थांबवतो आणि कित्येक हजार लिटर पाणीसाठा निर्माण करतो. याची पाने-फुले-फळे खोड मूळ सगळेच औषधी... कित्येक पशुपक्षी कीटक मुंग्याना आधार देतात. त्यांच्या कितीतरी पिढ्या यांच्या आधारात वाढतात. सगळ्यात जास्त प्रमाणात प्राणवायू सोडतो आणि तो पानांच्या वाटे सोडला जातो. आपल्याकडे वटपौर्णिमेला सगळ्यात जास्त प्रमाणात वडाच्या फांद्या तोडून वडाच्या झाडाला अक्षरशः ओरबाडून सावित्रींसाठी विक्रीला आणल्या जातात. ही खरेदी विक्री किती योग्य आहे आणि याच्यावर नियंत्रण ठेवणार कोण? महानगरपालिका पोलीस प्रशासन आणि वन विभाग झाडासाठी काम करणाऱ्या संस्था की स्वतः सावित्री... कोणीतरी आपली जबाबदारी पार पाडण्यासाठी पुढे यावे आणि हे थांबवावे. म्हणून आपल्या भारतात महाराष्ट्रात जिथे जिथे मंदिर आहेत तिथे तिथे वडाची झाडे आहेत, असे घरातल्या घरात एकटे वडाच्या फाद्या तोडून नँनो वटपौर्णिमा करण्यापेक्षा सगळ्या महिलांनी बाहेर एकत्र येऊन वडाच्या झाडाला फेऱ्या मारुन एकमेकींना भेटून वाण देऊन मोकळ्या जागेत भरपूर प्रमाणात प्राणवायू घेऊन साजरी करावी.

– **मयूर प्रकाश ढोलम,** जोगेश्वरी

### सारथ्य कोणीही करा...

वृत्तवाहिन्यांवरील नागपूर-मुंबई समृद्धीमार्गच्या चौथ्या आणि शेवटच्या टप्प्याचा लोकार्पण सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न झाला. मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांनी हजेरी लावून आम्ही एक आहोतचा दाखला जनतेपुढे दाखविण्याचा प्रयत्न सफल झाला आणि आपल्या कारकिर्दीत हा मोठा आणि उपयुक्त पल्ला पार पाडला ही आताच्या क्षणाला जरी जमेची बाजू वाटत असली तरी वृत्तवाहिन्यांनी एकनाथ शिंदेंनी सारथ्य केले ह्यावरच जोर दिला, थोडक्यात नेत्यांप्रमाणे वृत्तवाहिन्यांना पण राजकारणच आवडते हे दुर्दैव आहे. असो. समृद्धी मार्गाचे श्रेय देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला जाते त्यामुळे जनता जनार्दच्या कौतुकास पात्र आहात आणि सारथ्य कणीही केले तरी जनतेच्या माफक समस्यांकडे दुर्लक्ष करु नका ही अपेक्षा!

– **अरुण बधान,** डोंबिवली

### लष्कराची पर्यायाने देशाच्या बदनामीचे स्वातंत्र्य नाहीच

भारतीय राज्यघटनेचा आधार घेत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली अनेकदा जाणीवपूर्वक भारतीय लष्कराची आणि त्यांच्या कृतीची अप्रत्यक्षपणे बदनामी केली जात आहे. अलीकडेच उदाहरण म्हणजे ऑपरेशन सिंदूर यात पाकिस्तानशी दोन हात करण्यासाठी भारताने आपल्या लष्कराला फ्री हँण्ड दिला होता म्हणजे लष्कराला योग्य वाटेल तशी व तेवढी धडक कारवाई अपेक्षित होती. आपल्या लष्कराच्या कारवाईंने शत्रू राष्ट्रे चांगलीच दबावात आली पण विरोधकांचे काही समाधान झाले नाही. राहुल गांधी वारंवार म्हणतात भारताने शरणागती पत्करली म्हणजेच आपोआपच लष्कराची बदनामी होत आहे. राहुल गांधी यांच्याजवळ संसदेचे जबाबदार पद म्हणजे विरोधी पक्षनेते पद आहे. याआधी सुद्धा अनेक वादग्रस्त विधानासाठी त्यांना न्यायालयाने सुनावले आहे. नुकतेच अलाहाबाद हायकोर्टाने कॉंग्रेस पक्षाच्या भारत जोडो यात्रेत सैनिकांना अर्थात देशाला उद्देशून खा.राहुल गांधींनी अपमानास्पद विधान केले होते त्यावर न्यायालयाने खा.राहुल गांधींना चांगलेच फटकारले असून अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली लष्कराची पर्यायाने देशाची बदनामी कदापि करता येणार नाही, असे म्हटले आहे.

– **संजय साळगांवकर,** कुर्ला

### भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त कायमस्वरूपी करा...

सध्या भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला असून मोठ्यांपासून लहानांपर्यंत अनेकजण कुत्र्यांच्या हल्ल्यात जायबंदी झाले आहेत. विविध परिसरात या भटक्या कुत्र्यांची दहशत आहे. कचराकुंड्या, उकिरडा, रेल्वे स्थानक, मंदिर परिसर, शाळा पटांगण, सोसायटी, सार्वजनिक ठिकाणांचा भटक्या कुत्र्यांनी ताबा घेतल्याचे दिसून येते. यामुळे नागरिक आणि शालेय विद्यार्थी कमालीचे त्रस्त असून पालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही या कुत्र्यांचा बंदोबस्त होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नागरिकांच्या वतीने कुत्र्यांचा तत्काळ बंदोबस्त न केल्यास हे भटके कुत्रे पालिका मुख्यालयात सोडून आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला जात असला तरी याकडे दुर्लक्ष केले जाते. शाळकरी विद्यार्थ्यांचा हे भटके कुत्रे पाठलाग करतात यामुळे भीतीने शाळेत जाण्यास मुले टाळाटाळ करत असल्याची पालकांची तक्रार आहे. रात्री रस्त्याने ये-जा करणे कठीण झाले असून चालतच नव्हे, तर दुचाकीवरून जाणाऱ्या वाहनचालकांचा हे कुत्रे पाठलाग करतात दरम्यान दुचाकीवरील नियंत्रण सुटून मोठ्या अपघाताच्या घटना घडल्या आहेत. यामुळे तातडीने या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी अनेकदा पालिका प्रशासनाकडे करण्यात आली. तक्रार केल्यानंतर काही भटक्या कुत्र्यांना उचलून नेण्याचा देखावा केला जातो, मात्र प्रश्न सुटत नाही. वृद्ध, महिला, शाळकरी मुले, गरोदर स्त्रिया यांच्याप्रमाणेच शांतताप्रेमी नागरिक, दुचाकीचालक, रिक्षा-टॅक्सी चालक यांनाही भटक्या कुत्र्यांचा उपद्रव होत आहे. कुत्र्यांच्या बाजूने प्राणीप्रेमींच्या संघटना, मानवतावादी संस्था उभ्या ठाकतात, पोलिसात फिर्यादीही दाखल केल्या जातात. आता पावसाळ्यात श्वानदंश झाल्यास होणारा शारीरिक आणि मानसिक त्रास मोठा आहे. माणूस कुत्र्यांना त्रास देत नसेल तर अशा भटक्या, चावऱ्या कुत्र्यांचाही ताप माणसाला होऊ नये अशी साधी अपेक्षा अनेकजण व्यक्त करत असून सरकारने तातडीने असल्या भटक्या कुत्र्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत !

– **राजू जाधव,** मांगूर, जि.बेळगाव

आपल्या समाजात अजूनही स्त्री – पुरुष समानता पाळली जात नाही. बहुतेक सर्वच क्षेत्रात आजची स्त्री गगनभरारी घेत असली तरी ही समानता, महिला सक्षमीकरण, तळागाळापर्यंत रुजवण्यासाठी भगीरथ प्रयत्न आवश्यक आहेत. तिच्यात उपजतच असलेली, दुर्दम्य इच्छा शक्तीची, भक्कम आणि स्थिर स्त्री मात्र कुठे तरी हरवलेली आहे. ती शोधण्यात आपण मदत करणार ना?

# “कुठे हरवलीस गं तू?”



अलीकडे काही दिवसांत, अनेक प्रसार माध्यमांवर गाजत असलेल्या वैष्णवी हगवणे प्रकरणामुळे “हुंडा प्रथा आणि हुंडा बळी” यावर जोरदार चर्चा सुरू आहे. वैष्णवी हगवणे हिच्यावर तिचा पती आणि सासरच्या मंडळींनी केलेले अमानुष अत्याचार आणि त्यातून तिने केलेली आत्महत्या हे काही दुर्मीळ प्रकरण नाही. एका खासगी संघटनेच्या आकडेवारीनुसार, गेल्या दहा वर्षांत १ लाख ८७ हजार ८७९ महिला हुंडा बळी ठरल्या आहेत. २०१७ ते २०२१ दरम्यान आपल्या देशात ३५ हजार ४९३ हुंडा बळी नोंदवण्यात आले. म्हणजे दररोज सुमारे २० मुलींना हुंड्याच्या लालसेपोटी आपला जीव गमवावा लागतो. समाजासाठी हे किती लाजिरवाणे आहे. हुंडा देणं किंवा घेणं हा कायद्याने गुन्हा असूनही हुंडा बळी किंवा कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे.

खरंतर हुंडा किंवा दहेज ही प्रथा भारतीय समाजातच नव्हे तर जगात अनेक देशांमध्ये ती मुळावलेली आहे. विविध संस्कृतींमध्ये त्याचा उल्लेख आढळतो. दहेज हा उर्दू शब्द “जहेज” या शब्दाचा अपभ्रंश असून तो अरेबियन देशांमध्ये प्रचलित आहे. मध्ययुगीन काळात युरोपमध्ये विवाहाच्या वेळी भेटीचं आदानप्रदान करण्यात येई. पोर्तुगीज राजाने, आपली बहीण कॅथरीन हिचा विवाह इंग्लंडचा राजघराण्यातील चार्ल्स द्वितीय बरोबर केला. त्यावेळी मुंबई बंदर आंदण म्हणून दिलं होतं. भारतामध्ये ही प्रथा कशी सुरू झाली? अनेक इतिहासकार आणि समाजशास्त्रज्ञ यांच्या मते, आपला देश कृषीप्रधान असून आपली अर्थव्यवस्था कृषीवर आधारित आहे. त्यामुळे इतर संपत्तीपेक्षा जमिनीची मालकी मोठ्या प्रमाणावर होती. आपल्या समाजात पितृसत्ताक कुटुंब पद्धती रूढ आहे. त्यामुळे मुलगी सासरी जाताना, जमिनीचे वाटे करणे कठीण असल्यामुळे मालमत्तेचा वाटा म्हणून सोनेनाणे, विविध भेटवस्तू, कृषी उत्पादनाचा वाटा तिला स्वेच्छेने देण्यात येत असे. त्याला स्त्री धन म्हणायचे (अजूनही म्हणतात) आणि त्यावर सासरच्या कुणाचाही हक्क नसे. अतिशय चांगल्या हेतूने आचरणात असलेल्या या प्रथेला मात्र कालांतराने विकृत वळण लागलं. त्यामागचा तर्क आणि विचार विस्मरणात गेला. किती विचित्र आहे ना, मुलीच्या सुरक्षिततेसाठी सुरू झालेल्या या प्रथेची परिणती आज छळ, अत्याचार, हत्या आणि आत्महत्येत होत आहे. सत्य कटू असते... पण कायद्यामध्ये तरतुदी असूनही आपल्या मुलींना सुरक्षा देण्यात, जपण्यात आपण अपयशी ठरलो आहोत हे खरं आहे. आजच्या सुधारलेल्या समाजात ही कुप्रथा संपायला हवी होती पण उलट ती वाढतच चालली आहे. त्याची काय कारणे असावीत?

आपल्या समाजात अजूनही स्त्री - पुरुष समानता पाळली जात नाही. बहुतेक सर्वच क्षेत्रात आजची स्त्री गगनभरारी घेत असली तरी ही समानता, महिला सक्षमीकरण, तळागाळापर्यंत रुजवण्यासाठी भगीरथ प्रयत्न आवश्यक आहेत. सामाजिक, आर्थिक सबलीकरणाचे नारे देण्यात येतात... बरीच जागरूकताही केली जाते... पण अनेक महिलांना याविषयीचे कायदे माहिती नाहीत किंवा माहिती असूनही त्यांचा लाभ घेण्याची हिंमत तिच्यामध्ये आलेली नाही.

मानसिकदृष्ट्या स्त्री अजूनही झुंज देत आहे. किंबहुना रोजच्या जीवनातील या तणावाबाबत ती बधिर होऊन जाते... कदाचित ते तिच्या अंगवळणी पडतं... पण त्यामुळे होणाऱ्या परिणामांची झळ तिला आणि तिच्या मुलांना, माता-पित्याला नक्कीच पोहोचते. आपला पुरुषप्रधान समाजही कसा आहे नाही?... एका स्त्रीने, मुलीने कसं वागायचं, हे तो वारंवार वेगवेगळ्या प्रकारे सांगत असतो. समाज आपल्याला सांगतो की स्त्रीने सुंदर असलं पाहिजे... गोरा रंग पाहिजे... आणि गोरं असलं तरी ते सौंदर्य साधं पाहिजे आणि हो... संस्कारी सुद्धा. घरात लहान थोर व्यक्तींची देखभाल, पालनपोषण, त्यांच्यावर संस्कार याचीही जबाबदारी स्त्रीची. आता हे सगळं करत असताना आपल्या तब्येतीकडे थोडं दुर्लक्ष झालं तर एवढंही जमत नाही का म्हणून ठपका स्त्रीवरच. घरात आणि ऑफिसमधल्या ताणाचं पर्यवसान चिडचिडीत झालं तर ‘किती कटकट करतेस’ म्हणून बोळवण केली जाते. घरातील स्वयंपाकपाणी, मोठ्यांची काळजी, सासू-सासऱ्यांचे टोमणे, नवऱ्याची मर्जी, मुलांचा अभ्यास, त्यांच्या भवितव्याचा विचार, ऑफिसची कामं, विकत घेतलेल्या घराचे हप्ते भरण्यात मदत, त्यामुळे जमा-खर्चाचं बिघडलेले गणित, स्वतःच्या आई - वडिलांचा विचार, रात्री दमून भागून पलंगावर पाठ टेकल्या टेकल्या दुसऱ्या दिवशीच्या तयारीचे विचार... एक नाही अनेक आव्हानं. सतत स्वतःला सिद्ध करण्याची तारेवरची कसरत. या सगळ्यांचा परिणाम आपल्या मानसिक स्वास्थ्यावर होत आहे हे तिच्या लक्षातच येत नाही. हुंड्यासाठी अत्याचार होत असलेली स्त्री तर पूर्णतः मोडून गेलेली असते. बऱ्याच जणी बदनामी, भीती आणि आधार न मिळाल्याने गप्प बसून सहन करत राहतात. प्रेम विवाह असेल तर कदाचित एक दिवस सगळं ठीक होईल अशी आशा बाळगतात. इकडे आई- वडीलही मुलीला एक जबाबदारी मानत असतात. समाजात आपली नाचक्की होईल आणि त्याचा परिणाम दुसऱ्या अपत्यांवर होईल अशी भीती त्यांनाही वाटत असते. त्यामुळे ‘थोडं सहन कर, अशा छोट्या छोट्या गोष्टी चालतच असतात’ अशी समजूत काढून मुलीला माघारी पाठवलं जातं. शिवाय दिलेल्या हुंड्यासाठी काढलेलं डोंगराएवढं कर्जही फेडायचं असतं. वैष्णवीच्या बाबतीत हेच घडलं. या प्रकरणात तिचे आई - वडील तितकेच दोषी असावेत का?



**मृदुला घोडके**

(माजी मराठी वृत्त विभाग प्रमुख आकाशवाणी, नवी दिल्ली)

जेव्हा एखाद्या स्त्रीवर अत्याचार होतो तेव्हा त्याचे घाव तिच्या मुलांना, माता-पित्याला सोसावे लागतात. समाजात मुलींना सुखी, आनंदी आणि सुरक्षित ठेवायचं असेल तर आपल्याला... समाजाला आपली मानसिकता बदलावी लागेल. मुलींना एक स्वतंत्र, समान व्यक्तिमत्त्व म्हणून वागवावं, जोपासावं लागेल. त्यांना सर्वच दृष्टीने सुशिक्षित बनवावं लागेल. दुर्दैवाने वैष्णवी हगवणे सारखे एखादे प्रकरण समोर आले तर हिंसा घडताना, ‘त्यांच्या घरातील बाब आहे’ असं म्हणून आपली सामाजिक जबाबदारी झटकून टाकता येणार नाही. नवरा आणि सासरच्या लोकांकडून होणारा शारीरिक, मानसिक, लैंगिक छळ सोसून, चेहऱ्यावरचं हसू कायम राखणारी, रात्रीच्या अंधारात अश्रूंनी आपली उशी भिजवणारी, स्वतःचा हुंदका दाबून ठेवून घरची इज्जत राखणारी, दुःख, वेदना, निराशा, असहायता याच्या अग्नीत आतल्या आत जळणारी... अशा अनेक वैष्णवी आपल्या अवतीभवती अजून आहेत. तिच्यात उपजतच असलेली, दुर्दम्य इच्छा शक्तीची, भक्कम आणि स्थिर स्त्री मात्र कुठेतरी हरवलेली आहे. ती शोधण्यात आपण मदत करणार ना?

# कोलाज

## महासागर जगातील आश्चर्य




समुद्र! पृथ्वीवरील एक अनोखा खजिना! समुद्र सर्वांना नेहमीच आकर्षित करतो. किनाऱ्यालगतच्या वाळूतून, पाण्यातून चालताना येणाऱ्या लाटेचा स्पर्श, पायाखालची सरकणारी वाळू, लाटेबरोबर येणारे छोटे सागरी जीव, (आता कचरा) लांबवरून एकातएक मिसळून मोठी होत जाणारी लाट, कठड्यावर बसून दूरवर समुद्राच्या अनंताकडे पाहताना दिसणारे क्षितिज, क्षितिजावर उगवणारा सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी आकाशात फाकलेल्या रंगांच्या छटा, समुद्राची भरती, ओहोटी, कधी शांत, कधी रौद्र रूप! ही समुद्राची अगदी प्राथमिक रूपे पाहतानाही आश्चर्य वाटते. महासागराच्या अंतरंगातील खजिना हे तर जगातील आश्चर्य !

महासागर म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एक मोठा खाऱ्या पाण्याचा साठा. महासागर पृथ्वीचा ७१ टक्के भाग व्यापतो. खरा महासागर एकच; पारंपरिकपणे तो मोठ्या पाण्याच्या समूहामध्ये विभागला गेला. ते पाच महासागर! महासागरांत पृथ्वीच्या ९७ टक्के पाणी आहे. महासागर पृथ्वीच्या जलचक्राचा, अन्नामध्ये प्रोटीनचा प्राथमिक घटक असून अर्थकारणाचाही महत्त्वाचा घटक आहे. महासागर मानवी जीवनाच्या प्रत्येक भागावर प्रकाश टाकणारा जगातील सर्वांत मोठा चमत्कार आहे. महासागर गुंतागुंतीची प्रणाली असून तो हवामान नियंत्रित करण्यापासून ऑक्सिजन, अन्न, औषधापासून रोजगार देण्यापर्यंत आपणास आधार देतो. पृथ्वीवर ५० टक्के ऑक्सिजन महासागर निर्माण करतो. जो प्रामुख्याने सूक्ष्मजलचर वनस्पती शेवाल (फायटोप्लँक्टन)पासून मिळतो. त्यामुळे जागतिक तापमान वाढ कमी करण्यास मदत होते. महासागर पर्यावरण संतुलनासाठीही महत्त्वाची भूमिका बजावतो. महासागरातील प्रत्येक घटक मानवाला आधार देतो तरीही त्याच मानवाने महासागराची विपुलता कमी केली, खोली प्रदूषित केली, किनारे प्लास्टिकच्या कचऱ्याने अस्वच्छ केले, अति मासेमारीमुळे ज्याचा शोधही लागला नाही अशा अनेक परिसंस्था उद्ध्वस्त केल्या.

आज महासागर पुढील संकटाचा सामना करत आहे.

१) कचऱ्यासोबत दरवर्षी फेकले जाणारे प्लास्टिक समुद्र प्राण्यांना इजा पोहोचविते आणि अन्न साखळीतही मिसळते.

२) तापमान वाढीमुळे प्रवाळांच्या भिंतीचे नुकसान होते.

३) अतिमासेमारीमुळे काही प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. ४) किनारपट्टीचा विकास, समुद्रात खोलवर उत्खननामुळे मॅन्ग्रोव्ह - समुद्री गवत या निवासस्थानांचा नाश होतो. हानिकारक मासेमारीच्या पद्धतीमुळे मत्स्य उत्पादनात घट. ५) महासागराचे अम्लीकरण, रासायनिक सांडपाणी, तेल तवंग; समुद्री जीवांना हानिकारक ठरतात. ६) समुद्र पातळी वाढीमुळे किनारपट्टीजवळचे शहर, गावे बुडण्याची समस्या.



**विशेष**

**मृणालिनी कुलकर्णी**

१९८२ पासून कॅनडामध्ये महासागराच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय सागरासंबंधी विविध संस्था एकत्रितपणे काम करीत होत्या. इतर क्षेत्राच्या तुलनेने महासागराचे प्रश्न मागे पडत होते. १९९२ मध्ये रिओ दि जानेरो येथे झालेल्या पृथ्वी शिखर परिषदेत जागतिक महासागर दिनाचा प्रस्ताव मांडला गेला. २००८ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी अधिकृतपणे जागतिक महासागर दिनाला मान्यता देऊन “८ जून हा दिवस जागतिक महासागर दिन” म्हणून घोषित केला. हेतू हा जगभरातील महासागराविषयी कृतज्ञता व्यक्त करणे. जा. म. दिनाचा मुख्य उद्देश -‘महासागराचे संरक्षण आणि संवर्धन करणे आणि जगभरातल्या लोकांमध्ये महासागराविषयी जागरूकता वाढविणे.’ यानिमित्ताने दरवर्षी महासागराला भेडसावणाऱ्या धोक्यांशी निगडित जागरूकतेसाठी वर्षभर काम करण्यासाठी एक विषय दिला जातो.

२०२५ ची थीम : “आश्चर्य : जे आपल्याला टिकवून ठेवते ते टिकविणे.” ही आहे. समुद्राच्या आतील खजिना पाहून खरोखरच आपण आश्चर्यचकित होतो. आश्चर्य ही शोधाची जननी आहे. तसेच आश्चर्य हा वैज्ञानिक ज्ञानाचा पाया आहे. हेच आश्चर्य आपल्याला महासागराविषयी काम करायला भाग पाडेल. महासागरातील आश्चर्य टिकविणे म्हणजेच त्याच्या संरक्षणाची गरज अधोरेखित केली आहे. महासागराचे भविष्य ठरविताना त्या आश्चर्याकडे दुर्लक्ष होता कामा नये.

१) महासागरांत कोट्यवधी प्रजातीचे अस्तित्व आहे. त्यापैकी अनेक अद्यापही शोधल्या गेल्या नाहीत. प्रवाळ भित्ती (कोरलरीफ) ज्या समुद्रातील ‘पावसाळी जंगल’ म्हणून ओळखल्या जातात. त्या समुद्राच्या तळाचा केवळ १% भाग व्यापतात. तेथे सुमारे २५% समुद्री जीव राहतात. ही परिसंस्था अत्यंत नाजूक असून अतिशय समृद्ध असून किनारपट्टी संरक्षण, पर्यटन आणि मासेमारीसाठी महत्त्वपूर्ण आहे. २) मॉरिशस भोवतालचा समुद्र प्रवाळ खडकांनी (कोरल रीफ) व्यापला आहे. हे कोरल रीफ जगातील सर्वात श्रीमंत सागरी खजिन्यांपैकी एक आहे. ते जगभरात अन्न आणि औषधांच्या स्रोतांसाठी प्रसिद्ध.

३) ऑस्ट्रेलियातील ग्रेट बॅरियर रीफ - मानवेतर प्राण्यांनी निर्माण केलेली विलक्षण पर्जन्यवन टेकडी. प्रवाळातील जीवांची जगातील सर्वात मोठी परिसंस्था. जैवविविधतेचा खजिना असलेले सगळ्यांत मोठे प्रवाळ बेट. येथील नैसर्गिक सौंदर्यामुळे स्कुबा डायव्हिंग हा पर्यटन उद्योग लोकप्रिय.

जागतिक अर्थव्यवस्थेसाठी महासागर खूप महत्त्वाचा आहे. मासेमारी, जहाज वाहतूक, पर्यटन आणि नूतनीकरण ऊर्जा यांसारख्या उद्योगांना तो आधार देतो. ऑगनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेंटच्या मते महासागरावर आधारित अर्थ व्यवस्था २०३० पर्यंत ३ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. विशेषतः विकसनशील देशांतील किनारपट्टी भागातील लोक महासागरावर उपजीविकेसाठी अवलंबून आहेत. मासेमारी ३ अब्जांहून अधिक लोकांचे प्राथमिक प्रोटीनस्रोत आहे. जागतिक व्यापाराच्या सुमारे ९०% वाहतूक समुद्रमार्गे होते. समुद्र पर्यटन : जसे की क्रुझ ट्रिप, समुद्रातील खेळ. किनारपट्टीवरील हॉटेल्स अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेला चालना देतात.

महासागराच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी पुढील कृतीवर भर देऊ शकतो. १) जैवविविधता जपण्यासाठी आणि परिसंस्था पुनरुजीवित करण्यासाठी समुद्री संरक्षित क्षेत्र वाढविणे.


२) कार्बन उत्सर्जन कमी करणे. नवीकरणीय ऊर्जा व शाश्वत वाहतूक वापरून महासागरातील दुष्परिणाम कमी करता येतील.

३) नवीन पर्यावरणपूरक तंत्रज्ञान प्रोत्साहित करणे. उदा. प्लास्टिकला पर्याय असलेल्या वस्तू, समुद्र कचरा संकलन प्रणाली. ४) मॅन्ग्रोव्ह व दलदलीचा भाग किनाऱ्याचे नैसर्गिकरीत्या संरक्षण करतात आणि कार्बन साठवितात. म्हणून किनारी परिसंस्थांचे पुनर्जीवन करावे.


मुले आणि तरुण पिढी महासागराच्या भविष्याची शिल्पकार आहेत. शिक्षण संस्थांनी ‘महासागर साक्षरता’ अभ्यासक्रमांत समाविष्ट करावी. महासागराची भूमिका समजल्यावर त्यांना जपण्याची जबाबदारीही समजेल. माणसांनी निर्माण केलेल्या समस्यांवर खरा उपाय मला वाटतो तो समुद्राला समजून घेणे. त्यासाठी समुद्रांना भेटी देणं. सातत्याने याविषयावर कार्यक्रम होणे आवश्यक आहे. नॅशनल जिओग्राफी पाहताना समुद्रांना अंतरंगाचे कुतूहल वाढते. टायटन सारख्या मोठ्या बोटी महासागरात गडप होतात. हे वाचताना त्या महासागराची खोली, व्याप्तीचे आश्चर्य वाटते.

जा. म. दिन म्हणजे ज्ञान मिळविण्याची, जबाबदारी स्वीकारण्याची, पर्यावरणपूरक शैली अंगीकारण्याची एक संधी आहे. आपण महासागराचे संरक्षण केल्यास हवामान बदलाशी तोंड देऊ शकतो. प्लास्टिकला दूर करा. या आपल्या छोट्या छोट्या कृतीच भविष्यात मोठा बदल आणू शकतात. शेवटी महासागराच्या अंतरंगातील आश्चर्य टिकवा आणि अभ्यासा.

mbk1801@gmail.com



# कोशकार गंगाधर खानोलकर



शोधक, संतुलित मनाचा पत्रकार, साक्षेपी संपादक, व्यासंगी कोशकार, संशोधक, चरित्र लेखक अशा चढत्या श्रेणीने ज्या गंगाधर खानोलकरांनी साहित्यक्षेत्रात अत्युच्च स्थान मिळवले आहे. एक प्रकारे खानोलकरांनी आयुष्यभर मांडलेल्या ज्ञानयज्ञाचे पौरोहित्यच केले आहे. त्या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाची उषा टाकळकर सहाय्यक संपादक म्हणून काम करीत राहिली होती. गंगाधर देवराव खानोलकर आणि उषा प्रभाकर टाकळकर या दोघांनी अविश्रांत खपून मराठी वाङ्मयसेवक चरित्र कोशाचे २ खंड तयार केले आहेत.

वडिलांच्या व्यावसायिक बदल्यांमुळे गंगाधररावांचे बालपण भ्रमंतीत गेले. प्राथमिक शिक्षण घरीच झाले. मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण सावंतवाडी व मालवण येथे टोपीवाला हायस्कूलमध्ये झाले. असहकार चळवळीत सहभागी झाल्याने ते मॅट्रिक परीक्षेस बसले नाहीत. पिता ज्ञानपिपासू, ग्रंथप्रेमी व माणुसकी हा एकच धर्म मानणारा आणि आई स्वाभिमानी, स्वावलंबी व त्यागी. या उभयतांचे दृढ संस्कार होऊन १९२० ते १९२३ या काळात गंगाधररावांनी रवींद्रनाथांच्या शांतिनिकेतनमधील विश्वभारती विद्यापीठात, निसर्गाच्या मोकळ्या वातावरणात वाङ्मयाचा विद्यार्थी म्हणून प्रविष्ट होऊन अनेक थोर विद्वानांचे व गुरू या नात्याने रवींद्रनाथांचे मार्गदर्शन प्राप्त केले. खूप वाचन, चिंतन-मननाची सवय लावून घेतली. येथील निखळ ज्ञानसाधकी शैक्षणिक संस्कारांची शिदोरी त्यांनी आयुष्यभर केलेल्या साहित्य सेवेत त्यांना सतत प्रेरणा देत राहिली.

त्यानंतर अमळनेर तत्त्वज्ञान मंदिरात शिष्यवृत्ती घेऊन दोन वर्षे तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करून त्यांनी काही काळ तळेगावच्या राष्ट्रीय विचाराच्या समर्थ विद्यालयात शिक्षक या नात्याने काम केले. त्यानंतर ते मुंबईच्या वृत्तपत्राच्या दुनियेत लोकहित, विविधवृत्त, प्रगती, रणगर्जना साप्ताहिक इत्यादी वृत्तपत्रांचे संपादक झाले. १९२६ च्या सुमारास मुंबईत स्थिर झाल्यावर ते वाङ्मयीन चळवळीशी बद्ध झाले. त्यांनी स्वतः अनुभवलेली साहित्याची अडचण व उणीव दूर करण्यासाठी संशोधन क्षेत्रातील साधन साहित्याचा संग्रह सुरू केला आणि कोशकार, विश्लेषक, चरित्रलेखक, ग्रंथसंपादक म्हणून मराठी वाङ्मयाच्या इतिहासात अविस्मरणीय अशी कामगिरी करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा व कर्तृत्वाचा ठसा उमटवला व पुढील पिढ्यांसाठी एक आदर्श निर्माण केला.

खानोलकर यांनी काही नोकऱ्या केल्या, त्याही मुद्रण-प्रकाशन संस्थेतच. १९३१ मध्ये त्यांनी ‘अर्वाचीन मराठी वाङ्मय सेवक’ चरित्रकोशाच्या लेखनाचा शुभारंभ केला. जानेवारी १९३३ मध्ये सुरू केलेल्या प्रतिभा पाक्षिकाचा उद्देश होता महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील वाङ्मयविषयक चळवळींची माहिती प्रसिद्ध करणे, प्रसिद्ध होणाऱ्या वाङ्मयाची चर्चा, ग्रंथलेखन, ग्रंथप्रकाशन, ग्रंथमुद्रण याविषयींचे विचार प्रसिद्ध करणे व मराठी वाङ्मयाच्या एकंदर प्रगतीस साहाय्यक होईल असा मतप्रचार करणे. पुढे ८ एप्रिल १९४० पासून समीक्षक पाक्षिक व ३१ ऑक्टोबर १९४८ पासून रविकिरण साप्ताहिक चालू केले. मराठीतील पूर्णतः वाङ्मयीन स्वरूप असलेल्या पहिल्या-वहिल्या (प्रतिभा) नियतकालिकाच्या संपादनात के. ना. काळे व वि. ह. कुलकर्णी यांचा सहभाग होता. यासोबत ‘प्रतिभा प्रकाशन मंडळ’ निघून त्या उत्साही वातावरणात माधवराव पटवर्धन, गिरीश, यशवंत, श्री. बा. रानडे. खं. सा. दौंडकर, माडखोलकर, खांडेकर, श्री. के. क्षीरसागर अशांशी सहवास व विचारांची देवाणघेवाण होऊन साहित्याची जाण परिपक्व झाली व परिणामी उपकारक ठरली.



**कोकण आयकॉन**

**सतीश पाटणकर**

यानंतरच्या रविवार साप्ताहिकात सर्वसामान्यांसाठी आकर्षक अशा विविध विषयांचा समावेश असे. प्रत्येक नियतकालिक भिन्न प्रकृत्तीचे पण दर्जेदार असे व अभिरुची संपन्न असे. आर्थिक समस्येमुळे पहिली दोन नियतकालिके अन्य चालकांकडे द्यावी लागली. तिसरे सव्वा वर्ष चालले. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनी लेखनाला सुरुवात केली. नामांकित नियतकालिकांतून कथा, वाङ्मयविषयक लेख प्रकाशित केले. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे त्यांचे लेखन-क्षेत्रातले गुरू. रम्य भावाविष्काराच्या त्यांच्या कथा, प्रेम आणि विद्वत्ता व इतर कथा या संग्रहात समाविष्ट आहेत. त्यांचे दैवत असणाऱ्या श्री. कृ. कोल्हटकर, वि. गो. विजापूरकर व वि. का. राजवाडे लिहिलेल्या छोटेखानी चरित्रांत चरित्रनायकांची समर्पक ओळख पटविणारी कामगिरी ही विश्वसनीय असल्याची छाप पडते, कारण त्यांचे लेखन निष्ठेने व अस्सल कागदपत्रांच्या आधारे केलेले असे. एक वालचंद चरित्र सोडले तर मी लिहिलेल्या सर्व चरित्रांचे संकल्पन, संयोजन, पूर्वनियोजन प्रत्यक्ष लेखनाआधी कितीतरी काळ झालेले असते. हे त्यांचे म्हणणे वाचकाला प्रचिती आणून देते यात शंका नाही. माधव जूलिअन जीवनकथा हा चरित्रलेखनाच्या दृष्टीने चरित्रवाङ्मयात आदर्शवत असा मराठीतील पहिलाच चरित्रग्रंथ होय. रवींद्रनाथ जीवनकथा वालचंद हिराचंद : व्यक्ती, काल व कर्तृत्व साहित्यसिंह (श्री. कृ. कोल्हटकर) ‘जीवनगाथा (१९७२); यांपैकी वालचंद हिराचंद हे औद्योगिक क्षेत्रातले खंदे शिल्पकार. प्रत्येक चरित्रनायकाच्या जीवनानुसार वळणे व कार्यकर्तृत्व दाखवीत वेगळा व स्वतंत्र घाट प्राप्त करून देण्याचे कसब खानोलकरांच्या साक्षेपी, कुशल लेखनाने साधले आहे, असे चरित्र वाचताना वाटते.

खानोलकरांच्या जडणघडणीच्या काळातील महाराष्ट्र रसवंती पद्य : भाग १ ते ३ व ‘मराठी गद्य वैभव : भाग १ ते ३ ही १९३५ ची संपादने उत्कृष्ट पाठ्यपुस्तकांच्या कसोटीला उतरली. खानोलकरांच्या गुणसमुच्चयामुळे यशस्वी चरित्रलेखक म्हणून त्यांची कीर्ती उत्तरोत्तर उज्ज्वल होत गेली. ४५ वर्षांपूर्वी लिहिलेल्या श्री. कृ. कोल्हटकरांच्या छोट्या चरित्राला साडेसहाशे ‘डेमी’ पृष्ठांचे स्वरूप प्राप्त करून दिले. खानोलकरांनी सतत २० वर्षे परिश्रमाने संग्रहित केलेल्या साधनसामग्रीच्या आधाराने दोन-तीन वर्षे लेखन करून हे साध्य झाले. चरित्र लेखनात त्यांचे स्वतंत्र होते. वाङ्मयातील ऐतिहासिक चरित्र लेखकाला वास्तव सत्याच्या अलीकडे किंवा पलीकडे केव्हाही जाता येत नाही. आटोकाट परिश्रमाने जी साधनसामग्री उपलब्ध झाली असेल, तिच्यावर त्याला निर्वाह करावा लागतो; या मर्यादा असल्या, तरी ललित चरित्राची स्वतःची बलस्थाने आहेत. उत्कृष्ट चरित्र निर्माण करणे हे मुख्यतः कलेचे काम आहे. या कामात खानोलकर निश्चितच यशस्वी झाले आहेत. त्यांनी वयाच्या सत्तरीच्या सुमारास मराठी वाङ्मय कोशाची चार खंडांत विभागलेली एक विस्तृत योजना तयार करून तिच्या संपादनाची धुरा स्वीकारली (१९६९-१९८२). अशी योजना कोणत्याही भारतीय भाषेत संकल्पिली गेली नव्हती हे तिचे वेगळेपण समग्र वाङ्मय व्यापार चरित्रांच्या आनुषंगाने ललित-अललित समाविष्ट व्हावा ही अपेक्षा होती.कोशनिर्मितीच्या प्रचंड व किचकट; परंतु अत्यंत उपयोगी कामासाठी संपादकापाशी चिवट कार्यशक्ती, पूर्वग्रहविमुक्त दृष्टी, चौफेर व्यासंग, रसास्वाद वृत्ती, इतिहासाची सूक्ष्म जाण आणि कामातील शिस्त, पद्धतशीरपणा, योजकता इत्यादी विविध गुण असावे लागतात. ते गुण दृढव्रती खानोलकरांपाशी असल्यामुळे, त्यांनी अपार परिश्रमाने साधनसामग्री जमवणे कोशनिर्मिती करणे अशी दुहेरी जबाबदारी अभ्यासक व वाङ्मयसेवक या भूमिकांतून उत्तम तऱ्हने पार पाडली. त्यांनी लिहिलेली चरित्रे वाचकांच्या पसंतीस उतरली व त्यांनी कल्पनेचे मिश्रण न करता चरित्रातील साम्य-विरोध, मर्मस्थाने, नाट्य, गूढता वगैरेंवर सूचक भाष्य केले. अभिव्यक्तीचे नवे तंत्र मराठी चरित्र-वाङ्मयात आणून घटना, प्रसंग, लेख, व्यक्तिविशेष, जीवनविशेष यांचे वर्णन स्वतः न करता, कोणाचा तरी नेमका उतारा देऊन ते त्याचा ताजेपणा वाचकांपर्यंत पोहोचवत. जीवनभर मराठी वाङ्मयाची सेवा करून त्यांनी अभ्यासक, संशोधक, संपादक, संग्राहकांसाठी एक आदर्श निर्माण केला, ही वस्तुस्थिती पुसली जाणार नाही.

**(लेखक मुख्यमंत्र्यांचे माजी माहिती अधिकारी आहेत.)**

# बिंदुसरा नदीने घेतला मोकळा श्वास

## २५ वर्षांनंतर बिंदुसरा नदी स्वच्छ

## आ.संदीप क्षीरसागरांनी मानले अजितदादांचे आभार

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शहराची जलधारा असलेली बिंदुसरा नदीला आवळला गेलेला अस्वच्छतेचा फास ना.अजितदादांनी सोडविला आणि तब्बल २५ वर्षांनंतर बिंदुसरा नदीने मोकळा श्वास घेतला. ना.अजितदादांनी तातडीने बिंदुसरा नदी स्वच्छतेच्या कामासाठी तातडीने यंत्रणा उभी करून दिली. त्यामुळेच बिंदुसरा नदीची स्वच्छता करणे शक्य झाले आहे. बिंदुसरा नदीची स्वच्छता झाल्यामुळे बीड शहरात पुराचा धोका कमी झाला आहे. सोबतच बीड शहरात पाणी साठवणूक करण्यासाठीही व्यवस्था झाली आहे. त्याबद्दल बीड शहरवीसीयांच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

बीड शहरातून बिंदुसरा नदी वाहते. परंतु गेल्या २५ वर्षांपासून या नदीच्या संवर्धनासाठी कसल्याही प्रकारचे काम झाले नव्हते त्यामुळे बीड शहर आणि तालुक्याची जलधारा असलेली बिंदुसरा नदीची अतिशय वाईट अवस्था झाली होती. बीड शहरात पावसाळ्याच्या काळात पुराचा धोका टाळण्यासाठी नदीची स्वच्छता होणे अत्यंत गरजेचे होते. ही बाब लक्षात घेऊन आ.संदीप क्षीरसागर यांच्या मागणीनुसार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांनी तातडीने यंत्रणा उभी करून दिली. विशेष म्हणजे या महत्वाच्या कामासाठी कसलीही निविदा प्रक्रिया वगैरे वेळ लागणार्या प्रक्रियेतून न जाता आपल्या स्तरावरूनच ना.अजित दादांनी यंत्रणा कामाला लावली. ना.अजितदादांच्या निर्देशावरून २० मे २०२५ रोजी मा. जिल्हाधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासन, बीड नगरपालिका प्रशासन आदी कामाला लागले आणि बिंदुसरा नदीची स्वच्छता मोहीम सुरू झाली. गेल्या १७ दिवसांमध्ये अखंडितपणे नदीची स्वच्छता करण्याचे काम सुरु होते. शेवटी ना.अजित दादांमुळेच हे शक्य झाले. ना.दादांच्या सूचनेवरून शासकीय विभाग, विविध सामाजिक संस्था आणि प्रशासकीय यंत्रणा यांनी जोमाने काम करत बिंदुसरा नदीला अस्वच्छतेच्या विळख्यातून बाहेर काढले. बिंदुसरा नदीची स्वच्छता झाल्यामुळे गेल्या आठवड्यात पूरपरिस्थीती निर्माण होण्यासारखी अतिवृष्टी झाल्यानंतरही बीड शहराला पूराचा धोका झाला नाही. सोबतच बिंदुसरा धारणाच्या मोठ्या चादरीवरून पाणी वाहीले तरीही बीड शहरात कुठेही पाणी शिरले नाही. ही अतिशय मोठी आणि समाधानकारक बाब आहे. यापुढील काळातही बीब शहराला बिंदुसरा नदीच्या पान २ वर



### सर्वच सहभागी यंत्रणांचेही आभार आ.संदीप क्षीरसागर

दि.२० मे रोजी बिंदुसरा नदी स्वच्छता आणि खोलीकरण कामाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर सलग आजपर्यंत १७ दिवसांच्या स्वच्छता मोहीमेत मा.जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक यंत्रणांनी सहभाग नोंदवला. नगरपालिका प्रशासन, महसूल प्रशासन, जायकवाडी पाटबंधारे विभाग यांच्यासह भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांनीही स्वेच्छेने सहभाग घेतला होता. सर्वांच्या सहकार्यामुळेच बिंदुसरा नदीचे स्वच्छताकाम पूर्णत्वास जाऊ शकले. याबद्दल मा.जिल्हाधिकारी आणि बिंदुसरा नदीच्या स्वच्छता मोहीमेत सहभागी झालेल्या सर्व यंत्रणांचे आ.संदीप क्षीरसागर यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# कड्यामध्ये चोरट्यांचा धुडगूस

**चोरीसत्र:** व्यवसायिक झाले भयभित



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:येथील आंबेडकर चौकातील जय मल्हार मशिनरी आणि अशोक पशुखाद्य तर केरूळ चौकातील गणेश पान सेंटर या तीनही ठिकाणी एकाच दिवशी दुकानफोडी करून चोरट्यांनी लाखाच्या जवळपास ऐवज लंपास केला. सदर घटना शुक्रवारी मध्यरात्री कडा –धामणगाव रस्त्यालगत घडली.

आष्टी तालुक्यातील कडा येथील डॉ. आंबेडकर चौक ते केरूळ चौक, कडा– धामणगाव रस्त्यालगत चोरट्यांनी दुकानावर डल्ला मारून शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास धुडगूस घालून दोन दुकानांसह एक पानाची टपरी फोडून लाखभर रुपयांच्या ऐवज लुटून पोबारा केला. कडा येथील आंबेडकर चौकातील धामणगाव रोडलगत असलेले मल्हारी पाचपुते यांचे, जय मल्हार मशिनरी व अशोक हजारे, यांचे अशोक पशुखाद्य ही दोनही दुकाने चोरट्यांनी मागच्या बाजूने फोडली. पाचपुते यांच्या मागच्या लोखंडी शटरचे कुलूप पट्टी तोडून चोरट्यांनी दुकानात प्रवेश केला. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याची वायर काढून दुकानातील पंचावन हजाराची कॉपर वायर, आठ ते दहा हजाराचे पितळी नेपल आणि गल्ल्यातील पस्तीस हजाराची रोख रक्कम लांबवली. तर अशोक हजारे यांचे पशुखाद्य दुकान त्याच पद्धतीने फोडून त्यांच्याही गल्ल्यातील तीन–साडेतीन हजाराची रोकड व अडीचशे तीनशे रुपयांची चिल्लर चोरट्यांनी गायब केली. त्यांच्याच शेजारच्या नाझिया कलेक्शनच्या छताच्या पत्र्याचे हुक काढण्याचा प्रयत्न केला. दुसरीकडे त्याच दिवशी केरूळ चौकातील संपत परदेशी यांची पान २ वर

# धर्मवीर क्रिकेट क्लबचा विजय

**अभिनंदनिय:**बाजीराव चव्हाणांची क्रिकेट क्षेत्रातही आघाडी





पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:छझङ नेकनूर प्रीमियर लीग २०२५ या क्रिकेट स्पर्धेत बाजीराव दादा चव्हाण यांचा संघ धर्मवीर क्रिकेट क्लब, बालाघाट – यांनी अंतिम सामन्यात जोरदार कामगिरी करत स्पर्धेचे प्रथम विजेतेपद पटकावले आहे. या विजयानंतर बाजीराव दादांची क्रीडा क्षेत्रातील ही आघाडीची भूमिका अधोरेखित झाली आहे. नेकनूर येथे ५ जून रोजी स्पर्धा मोठ्या जल्लोषात पार पडली. धर्मवीर क्रिकेट क्लबच्या अखेरच्या सामन्यात अचूक फलंदाजी, कुशल गोलंदाजी आणि संघबांधणी यामुळे विरोधी संघावर मात करत चषक मिळवला आहे. या संघाचे नेतृत्व पठाण समीर जहांगीर यांनी केले, तर संघाला मार्गदर्शन अरविंद जाधव आणि काशिनाथ जाधव यांनी दिले, ज्यामुळे संघाची कामगिरी अधिक प्रभावी ठरली.

संघातील खेळाडूंमध्ये शेख लईख अहेमद, शेख उमेर पहेलवान, शेख इमरोज पहेलवान, प्रशांत दादा पाटील, संजय पवार बांगर, किरण जाधव (के.के), पठाण अदनान खान, पवन औताडे, रिजवान बागवान, शेख इरफान, शेख मखबूल, शेख इरफान (बब्बू), आणि पान २ वर

# नागसेन वसतीगृहात प्रवेश सुरु

**शैक्षणिक:**वस्तीगृहात प्रवेश घेण्याचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी




राहुरी:इयत्ता पाचवी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी नागसेन विद्यार्थी वसतीगृह, नेवासा येथे विद्यार्थ्यांसाठी प्रवेश सुरु झाल्याची माहिती अधिक्षक रोहित तेलतुंबडे यांनी दिली. या वसतिगृहात आर्थिक दुर्बल वंचित घटकांना मोफत प्रवेश दिला जाईल. या वसतिगृहात जिव्हाळ्याची यंत्रणा, मोफत पाठ्यपुस्तके आणि शैक्षणिक साहित्य, जिव्हाळ्याची यंत्रणा, व्यक्तिमत्व विकासासाठी पूरक शिक्षण, शासनाचा विपश्यनेचा दैनंदिन मित्र उपक्रम, आवश्यकतेनुसार शैक्षणिक समुपदेशन, मोफत भोजन व निवासस्थान सुविधा उपलब्ध आहे.

तरी गरजूंनी या वसतिगृहात प्रवेश घ्यावा असे आव्हान संस्थेचे कार्यकारी विश्वस्त ड. संघराज रुपवते, बुद्धिस्ट सोसायटीचे सत्येंद्र तेलतुंबडे, वसतिगृह व्यवस्थापन समितीचे प्रा. सातुरे, भास्कर खरे सर, समाज कल्याण सभापती राजेंद्र वाघमारे,जगधने सर, प्रा.गवाजी खंडागळे, पान २ वर

# शिवसेना उबाठा गटाचा मोर्चा

**आक्रमक:** लोणारमध्ये अवैध धंद्याविरोधात आंदोलन

पुण्यभूमी प्रतिनिधी



लोणार:येवती येथे खुलेआम अवैध दारू विक्री होत आहे अवैध दारू विक्री बंद करावी करीता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे यांच्या नेतृत्वात येवतीचे सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष व ग्रामस्थ महिलांसह एल्गार मोर्चा काढून अवैध दारू विक्री विरोधी घोषणांनी लोणार पोलीस स्टेशन परिसर दणाणून गेला. लोणार तालुक्यातील येवती गाव हे सामाजिक सलोख्याचे व एकात्मतेचे एक उदाहरण आहे परंतु दोन वर्षापासून या गावात व तालुक्यातील ग्रामीण भागात अवैध दारू विक्रीचा सुळसुळाट माजलेला आहे या अव्यध दारूमुळे या गावातील अनेक कुटुंब उध्वस्त झाले आहे दारूपाई गावातील अनेक लोकांनी आपले जीव गमावले आहे, अनेक महिलांनी पुरुषांच्या दारूपायी आत्महत्या करून आपली जीवन यात्रा संपवली आहे व पोलीस प्रशासन हे सर्व उघड्या डोळ्यांनी बघत आहे.

या गावातील व तालुक्यातील अवैध दारू विक्री बंद करण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे, तालुकाप्रमुख ड दीपक मापारी, शहरप्रमुख गजानन जाधव यांच्या नेतृत्वात येवती येथील शेकडो महिला व शिवसैनिकांनी पोलीस स्टेशनवर यलगार मोर्चा काढून अवैध दारू पान २ वर

# ड्राय- डे-च्या दिवशी हॉटेलवर छापा

**कारवाई:**हॉटेल चालकाविरुद्ध पोलिसात गुन्हा



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:तालुक्यातील शेरी बुद्रुक येथील 'हॉटेलवर ड्राय– डे– च्या दिवशी छापा मारून पोलिसांनी एक हजार आठशे रुपयाची देशी दारू जप्त करून हॉटेल चालकाविरुद्ध मुंबई दारूबंदी अधिनियम कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला.

आष्टी पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की तालुक्यातील नगर –बीड रोडलगत असलेल्या शेरी बुद्रुक येथील हॉटेल देवयानी या ठिकाणी शनिवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास ड्राय–डे असतानाही या हॉटेलवर बेकायदेशीररित्या देशी दारूची विक्री होत असल्याची खबर आष्टी पोलिसांना मिळाली होती. त्या पान २ वर

# निराधार कुटुंबाला माणुसकीचा हात

**ऋणानुबंध:**संसार उपयोगी साहित्याचे वाटप

पुण्यभूमी प्रतिनिधी



तेलगाव:नगर रोड कन्या शाळा बीड समोरील आवारात पत्र्याच्या शेडमध्ये ताडपत्रीने अच्छादलेल्या निवाऱ्या मध्ये वास्तव्य करणाऱ्या भानुदास विठ्ठल मुजमुले वय ६२ वर्षे, शोभा भानुदास मुजमुले व ५४ वर्षे हे दाम्पत्य दोन्ही पायांनी दिव्यांग आहेत त्यांच्या पदरात दहावीत शिकणारी तेजस्विनी नावाची मुलगी सुद्धा आहे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करून हे कुटुंबीय आपली गुजरान करतात ही बाब राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष समाजभूषण नानासाहेब घोडके यांना समजतात कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुनील माने दासराव गोरे यशराज बामणे यांना सोबत घेऊन फळाचे जीवन जगणाऱ्या मुजमुले कुटुंब यांना भेट देऊन धीर देत संसार उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रतिकूल परिस्थितीशी तोंड देत घर संसार आणि मुलींचे शिक्षण करत असताना कोणत्याही गोष्टीची भांडवल न करणाऱ्या या कुटुंबाला घोडके यांनी धीर देण्याबरोबरच लागणारे साहित्य वाटप करून आगामी काळात अडचणीत आलेल्या कुटुंबांना समर्थ न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघ कटिबद्ध असून समाजातील इतर घटकांनाही अशा कुटुंबाच्या पाठीमागे ताकद उभी करावी असेही मत समाजभूषण नानासाहेब घोडके यांनी व्यक्त केलं.

# रस्त्यावरील धडकेनंतर मारहाण

**कारवाई:**तलवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

पुण्यभूमी प्रतिनिधी



तलवाडा:गेवराई तालुक्यातील काठोडा येथे रस्त्यावरील वाहन धडकेनंतर तीन जणांनी मिळून शेतकऱ्याला मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली.

फिर्यादी ब्रम्हनाथ राजेंद्र कोकरे यांनी सांगितले, दि.३१ मे २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता ते मोटारसायकलवर कामावर जात असताना काठोडा–गोळेगाव रस्त्यावर जयदत्त लहूराव किरकट याने निष्काळजीपणे स्कॉर्पिओ चालवत त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली. यावरून वाद झाला असता जयदत्त, तुकाराम लहूराव किरकट आणि लहूराव अंबादास किरकट यांनी लोखंडी टांबीने, लाथा–बुक्क्यांनी आणि चापटांनी मारहाण केली. जयदत्तने ब्रम्हनाथ यांच्या डाव्या हाताच्या पंजावर मारून फ्रँक्चर केले आणि तक्रार दिल्यास जिवे मारीन अशी धमकी दिली. गोळेगाव फाट्यावरही पुन्हा मारहाण झाली. तलवाडा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल झाली असून गेवराई आणि बीडच्या सरकारी दवाखान्यात उपचारानंतर ब्रम्हनाथ यांना लोटस हॉस्पिटल, बीड येथे शस्त्रक्रिया करावी लागली. पोलीसांनी आरोपींविरुद्ध विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## अभिनंदनिय

## अभियंता सुनील इंगळेंच्या नेतृत्वाने कौतुकास्पद कामगिरी

# ब्लॅक डायमंड अन् विश्वकर्मा सन्मान

भगवान साकसमुद्रे परळी



परळी:औष्णिक वीज केंद्राच्या कोळसा हाताळणी विभागाला वर्ष २०२३–२४ आणि २०२४–२५ या कालावधीतील उत्कृष्ट कामगिरीसाठी 'ब्लॅक डायमंड' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ६ जून २०२५ रोजी मुंबई येथे महानिर्मितीच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाजनको कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी यांच्या हस्ते प्रभारी अधीक्षक अभियंता सुरेश गर्जे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

याच कार्यक्रमात कोळसा हाताळणी विभागातील दोन तंत्रज्ञांना, विक्रम पाठक (संच क्रमांक ६, ७, ८) आणि सचिन कानडे (यांत्रिकी देखभाल), त्यांच्या उत्कृष्ट वैयक्तिक योगदानाबद्दल 'विश्वकर्मा' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. विक्रम पाठक यांनी वाहन दुरुस्ती विभागात, विशेषतः खापरखेडा विद्युत केंद्रातील कठीण प्रसंगांमध्ये केलेल्या कामातून आपली कार्यक्षमता सिद्ध केली आहे. तर, सचिन कानडे हे यांत्रिकी देखभाल विभागात त्यांच्या उत्कृष्ट आणि नाविन्यपूर्ण कामांसाठी ओळखले जातात.

परळी औष्णिक वीज केंद्राची ही कामगिरी महानिर्मितीच्या १००० मेगावॉटपेक्षा कमी क्षमता असलेल्या विभागांमध्ये सर्वोत्कृष्ट ठरली आहे. संच क्रमांक ६, ७, ८ कोळसा हाताळणी विभागाने उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य आणि उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करत हे यश संपादन केले.या महत्त्वपूर्ण यशामागे परळी औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे, प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, आणि प्रभारी अधीक्षक अभियंता सुरेश गर्जे यांचे वेळोवेळी मिळालेले सहकार्य आणि मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. कोळसा हाताळणी विभागातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता शाहूराज येवते व गजानन आरोळे, उपकार्यकारी अभियंता गणेश बांगर, इम्रान मणियार, चंद्रकांत कोहाळे, धनंजय हट्टे, तसेच सर्व पान २ वर

# वादळी पावसामुळे विद्युत खांब वाकले!

**शेतकरी:** दुर्घटना घडण्यापूर्वी खांब उभे करावेत



पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:तालुक्यातील शेरी बुद्रुक परिसरात काही दिवसापूर्वी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतातील विद्युत खांब वाकले. त्यामुळे एखादी दुर्घटना घडण्यापूर्वी वाकलेले खांब उभे करावेत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. आष्टी तालुक्यात मागील पंधरा दिवसापूर्वी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेरी बुद्रुक येथील रमेश देशमुख यांच्या पान २ वर